## संपादकीय

### कामगारांचे हक्क अन् कामाचे तास...!

बहुतेक देशांत सरकारी आणि खासगी संस्थांमध्ये ८ ते ९ तास काम करण्याची संस्कृती आहे. मात्र इन्फोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्ती यांनी तरुणांनी आठवड्यातून ७० तास काम केले तर जगाच्या अर्थव्यवस्थेसोबत स्पर्धा करणे शक्य होईल असे म्हटले होते. नारायण मूर्ती यांचे मत व्यक्त झाल्यानंतर लार्सन अँड टुब्रो कंपनीचे अध्यक्ष एस. एन. सुब्रमण्यमही फॉर्मात आले. त्यांनी नारायण मूर्ती यांच्यापेक्षाही एक पाऊल पुढे टाकत कर्मचाऱ्यांनी एका आठवड्यात ९० तास काम करावे, असा सल्ला दिला. सुब्रमण्यम यांच्या वक्तव्यानंतर सोशल मीडियावर चर्चेचे पेव फुटले आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com



D.S.Nagargoje 8908165555 9175606738
A.S.Nagargoje 9284872700 8007003550
बालाजी बॅटरी हाऊस
सेल्स अ‍ॅण्ड सर्व्हीसेस
आमच्याकडे सर्व प्रकारच्या बॅटरी योग्य दरात मिळतील.
पत्ता : काकु-नाना हॉस्पिटल समोर, जालना रोड, बीड.



बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–२६५ गुरूवार, दि.१६ जानेवारी २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये


# शक्तिपीठ महामार्गावरून शेतकरी आंदोलनाच्या तयारीत

## भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश तर शेतकऱ्यांकडून विरोध

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तीपीठ महामार्गाचे कामकाज सुरू करण्याचे सोमवारी (दि.१३) निर्देश दिले, आणि त्यावरून पुन्हा राजकारण तापायला सुरुवात झाली असून, शेतकरी संघटनाकडून विरोध सुरू झाला आहे. या शक्तिपीठ महामार्गासाठी कोल्हापूर वगळता उर्वरित ११ जिल्ह्यातील भूसंपादनाचे काम करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे



शेतजमिनीची रणभूमी झाली तर बेहत्तर आम्ही शक्तीपीठ महामार्ग करू देणार नाही, असा इशारा शक्तिपीठ महामार्ग विरोधी शेतकरी संघर्ष समितीने दिला आहे.

नागपूर ते गोवा असा हा १२ जिल्ह्यातून जाणारा महामार्ग शेतकऱ्यांची सुपीक शेतजमीन गिळणार असल्याचा समितीचा आरोप आहे. त्यामुळे शक्तिपीठवरून लोकसभा निवडणुकीपूर्वीपासूनच शेतकऱ्यांनी जोरदार विरोध केला. तब्बल ८०५ किलोमीटर लांबीचा या नियोजित महामार्गासाठी २०२४ पासून राज्यात भूसंपादन सुरू करण्यात आले होते. या शक्तिपीठमधून पवनार ते पत्रादेवी दरम्यानची शक्तिस्थळं ◀◀ पान २ वर

### भूसंपादन प्रक्रिया सुरू

समर्थक आणि विरोधकांमध्ये दावे प्रतिदावे सुरू असताना राज्य सरकारच्या आदेशानंतर एमएसआरडीसीने पर्यावरण परवानगीचा प्रस्ताव केंद्र आणि राज्य सरकारला पाठवला आहे. आता भूसंपादन प्रक्रियेला पुन्हा सुरुवात करण्यात आली आहे. एकूण ९ हजार ३०० हेक्टरपैकी कोल्हापूर जिल्हा वगळता ८ हजार २०० हेक्टर जागेचे भूसंपादन एमएसआरडीसीकडून करण्यात येणार आहे. यामध्ये १ हजार १०० हेक्टर कोल्हापूर जिल्ह्यातील जागेचे भुसंपादन वगळण्यात आले आहे. त्यामुळे उर्वरित ११ जिल्ह्यात तर शक्तिपीठचं काम सुरू होणार आहे.

### कर्जमाफीला पैसे नाहीत मग ८६ हजार कोटी कसे खर्च करणार – शेट्टी

यावरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर जोरदार टिका केली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर अजितदादा म्हणतात, ‘‘अंथरूण पाहून पाय पसरावे‘‘, राज्यातील शेतकऱ्यांची २० हजार कोटींची कर्जमाफी करायला सरकारकडे पैसे नाहीत. मग ८६ हजार कोटीच्या शक्तिपीठ महामार्गाचा अट्टहास कशासाठी? असा सवाल शेट्टी यांनी उपस्थित केला आहे. वास्तवात शेतकऱ्यांची बागायत आणि सुपीक जमीन या प्रकल्पामुळे गिळली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा या महामार्गाला विरोध आहे. कोकणातून विदर्भात जाण्यासाठी समांतर मार्ग असतानाही राज्य सरकारकडून शक्तिपीठचा घाट घातला जात आहे.


### विद्यार्थ्यांचा गळा चिरून हत्या

छ.संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर येथे पदवीचे शिक्षण घेणाऱ्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील रहिवासी असलेल्या बीसीएसच्या विद्यार्थ्याची फ्लॅटमध्ये गळा चिरून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. प्रदीप विश्वनाथ निपटे (वय १९) रा.पिंपरखेड ता. वडवणी, जि. बीड असे या विद्यार्थ्याचे नाव असून, प्रदीपच्या हत्येमागे महाविद्यालयात झालेल्या वादाची पार्श्वभूमी असल्याचा प्राथमिक संशय पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. शनिवारी महाविद्यालयातील काही मुलांसोबत ◀◀ पान २ वर

# संतोष देशमुख यांच्या हत्येचं खरं कारण उघड

## सीआयडीचा कोर्टात सर्वात मोठा दावा; वाल्मिक कराडला ७ दिवसांची कोठडी





**बीड । प्रतिनिधी**

**मोक्का अंतर्गत कारवाई झाल्यानंतर पहिल्यांदाच वाल्मिक कराड यांना जिल्हा सत्र न्यायलयासमोर हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद, न्यायालयाकडून तपास अधिकाऱ्यांवर प्रश्नांचा भडीमार, कराड यांच्या वकिलाकडून बेकायदेशिर अटक असल्याचा युक्तीवाद यासह बऱ्याच मुद्द्यांवर चर्चा झाली. न्यायालयाने वाल्मिक कराड यांना ७ दिवसाची एसआयटी कोठडी सुनावली आहे. तसेच संतोष देशमुख यांच्या हत्येचे खरे कारण पहिल्यांदाच सीआयडी आणि एसआयटीने उघड करीत खंडणीच्या आड येत असल्यानेच संतोष देशमुख यांचा खून केल्याचा मोठा दावा केला.**

संतोष देशमुख यांची हत्या नेमकी का करण्यात आली? याचे कारण सीआयडीने कोर्टात सांगितले आहे. अवादा कंपनीकडून मागितलेली खंडणी आणि संतोष देशमुख ◀◀ पान २ वर

### न्यायाधीशांकडून तपास अधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती

फक्त फोन कॉलवर आरोपीला दोन्ही गुन्ह्यात आरोपी बनवण्यात आले आहे का? हत्या आणि खंडणी प्रकरणात फोन कॉलच्या बेसिसवर आरोपी बनवले आहे का? हत्येच्या गुन्ह्यात अटक करताना आरोपीचा सहभाग आहे याची खात्री केली होती का? असे प्रश्न न्यायाधीशांनी तपास अधिकाऱ्यांना विचारले. यासह तपास अधिकाऱ्यांवर न्यायाधीशांनी प्रश्नांचा भडीमार केला.

### आरोपीच्या वकिलाचा युक्तिवाद

कुठल्याही आरोपीने वाल्मिक कराडचे नाव घेतले नाही. वाल्मिक कराड विरोधात कुठलाही ठोस पुरावा नाही. वाल्मिक कराडवर हत्येचा गुन्हा लागू होऊ शकत नाही. वाल्मिक कराड यांची अटक बेकायदेशीर आहे.

### कराडबद्दल कोर्टात मोठे खुलासे

- कराडने हत्येच्या काही तास आधी धमकी दिली होती
- ९ डिसेंबरला ४ च्या दरम्यान संतोष देशमुखांचे अपहरण
- दुपारी ३.२० ते ३.४० घुले–चाटे–कराडचा संवाद
- सुदर्शन घुले, विष्णू चाटे, वाल्मिकची फोनवरुन चर्चा
- आरोपीने कट रचून देशमुखांची हत्या केली
- हे संघटित गुन्हेगारीचे प्रकरण
- तपासादरम्यान पुरावे मिळालेत
- पुराव्यांची उलट तपासणी करायची आहे
- घटनेतील १ मुख्य आरोपी कृष्णा आंधळे फरार आहे
- आंधळेला फरार व्हायला कराडने मदत केली का? हे तपासयचे आहे
- कराडची परदेशात मालमत्ता आहे का तपासायचे आहे

### शेतकरी नेते डल्लेवालांचे ५१ व्या दिवशीही बेमुदत उपोषण सुरुच

नवी दिल्ली : शेतकरी नेते जगजीत सिंह डल्लेवाल मागील तब्बल ५१ दिवसांपासून खनौरी सीमेवर बेमुदत उपोषण करत आहेत. त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. तरीही शेतकऱ्यांच्या शेतीमालाला एमएसपी मिळावा यांसह १३ विविध मागण्यांसाठी ते बेमुदत उपोषण करण्यावर ठाम आहेत. त्यांनी वैद्यकीय उपचार घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे. दरम्यान, डल्लेवाल यांच्या आरोग्याचा सविस्तर वैद्यकीय अहवाल सर्वोच्च न्यायालयाने मागवला आहे. ७० वर्षीय डल्लेवाल यांनी २६ नोव्हेंबर २०२४ पासून बेमुदत उपोषणाला सुरुवात ◀◀ पान २ वर

### एसआयटी आणि सरकारी वकिलांचा युक्तिवाद काय?

संतोष देशमुख यांची हत्या झाली त्या दिवशी वाल्मिक कराडचे आरोपी विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्यात फोनवर संभाषण झाले होते. या तीनही आरोपींमध्ये १० मिनिटे चर्चा झाली. संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबरला दुपारी ३ ते ३.१५ वाजेच्या दरम्यान अपहरण झाले होते, असा एफआयआरमध्ये उल्लेख आहे. त्याच दिवशी दुपारी ३.२० मिनिटे ते ३.४० मिनिटे या काळात वाल्मिक कराडचे विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्यामध्ये फोनवर वारंवार संभाषण झाल्याचा दाखला देत सरकारी वकिलांनी वाल्मिक कराडच्या १० दिवसांची सीआयडी कोठडी मागितली. आरोपींनी कट रचून संतोष देशमुख यांचे अपहरण केले आणि मग हत्या केली आहे. या गुन्ह्यातले आरोपी सराईत आहेत. त्यांची आधीही गुन्हेगारी पार्श्वभूमी राहिलेली आहेत. आरोपी कृष्णा आंधळे अजून फरार आहे. त्याला लपण्यासाठी ◀◀ पान २ वर

# कोर्टाबाहेर कराड–देशमुख समर्थक भिडले

## शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी ४५ जणांवर गुन्हा दाखल



कोर्टरूममध्ये फक्त न्यायाधीश, आरोपी, आरोपीचे वकील, तपास अधिकारी आणि सरकारी वकील उपस्थित होते. यानंतर वाल्मिक कराडला पोलीस कोठडीत घेऊन जात असताना संतोष देशमुख आणि वाल्मिक कराडचे समर्थक आमने–सामने आले. यावेळी घोषणाबाजी करण्यात येत असताना डीवायएपी विश्वंभर गोल्डे तेथे आले असता त्यांनी जमाव पांगवण्याचा प्रयत्न केला. यावेळी पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यावर त्यांच्यासह ४५ जणांवर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पोलिस– वकिलांमध्ये बाचाबाची

न्यायालयात युक्तीवाद सुरु असताना पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. मुख्य इमारतीकडे कोणालाच जावू दिले जात नव्हते. ॲड प्रभाकर आंधळे हे आपल्या टेबलावर पक्षकारासह बसले होते. यावेळी पोलिस उपाधिक्षक विश्वंभर गोल्डे यांनी बसलेल्या लोकांना बाहेर जाण्याचे सांगितले. मात्र ॲड. आंधळे यांनी हे माझे पक्षकार असून त्यांच्या मला सह्या घ्यायच्या आहेत, असे सांगितले. मात्र गोल्हे यांनी आक्रमक भुमिका घेतल्याने यावेळी ॲड आंधळे व एका महिला वकिलाशी त्यांची बाचाबाची झाली. मात्र काही वकिलांनी मध्यस्थी केल्याने वातावरण शांत झाले.

वाल्मिक कराडला न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यामुळे कोर्टाबाहेर मोठा जमाव होता. कराड यांना बाहेर घेऊन जात असताना देशमुख समर्थकांनी घोषणाबाजी केली. त्याला विरोध म्हणून कराड समर्थकांनीही घोषणाबाजी केली. त्यामुळे त्याठिकाणी तणावाचे वातावरण झाले होते. डीवायएसपी विश्वंभर ◀◀ पान २ वर

### तणाव निवळावा यासाठी गृहमंत्र्यांशी चर्चा करणार–पंकजा मुंडे



बीड : वाल्मिक कराडला मोक्का लावण्यात आल्यावर जिल्ह्यात वातावरण तणावाचे आहे. आंदोलने, आत्मदहनाचा प्रयत्न, शोले स्टाईल आंदोलन करण्यात येत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तर मंत्री पंकजा मुंडे यांनी मात्र यापासून स्वत:ला दूर ठेवल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात काय सुरू आहे ते मला काही माहिती नाही, मी माझ्या रोजच्या कामात व्यस्त आहे. माझ्यासाठी काम महत्त्वाचे आहे असे वक्तव्य त्यांनी केले. बीडमधील तणाव निवळावा यासाठी आपण गृहमंत्र्यांशी चर्चा करू असेही त्या म्हणाल्या.

धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड याला मकोका लावण्यात आला असून त्याला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यानंतर परळीमध्ये त्याच्या समर्थकांनी आंदोलन सुरू केले. मस्साजोगचे संरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून राजकीय आरोप–प्रत्यारोप सुरू आहेत. सत्ताधारी आणि विरोधकांनीही धनंजय मुंडे यांच्यावर ◀◀ पान २ वर

### सुनावणी इनकॅमेरा, मोजकेच लोक

बीडच्या मकोका कोर्टात इन कॅमेरावर सुनावणी पार पडली. कोर्टरूममध्ये फक्त न्यायाधीश, आरोपी, आरोपीचे वकील, तपास अधिकारी आणि सरकारी वकील उपस्थित होते. यावेळी एसआयटीने वाल्मिक कराडच्या सीआयडी कोठडीसाठी ९ ते १० ग्राउंडस मांडले. तर दुसरीकडे वाल्मिक कराडच्या वकिलांनी सर्व आरोप फेटाळत कराडची अटक बेकायदेशीर असल्याचे म्हटले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर कोर्टाने निकाल जाहीर केला.

### देशमुखांना धमकी अन् तीन आरोपींमध्ये चर्चा

संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबरला दुपारी ३ ते ३.१५ वाजेच्या दरम्यान अपहरण झाले होते, असा एफआयआरमध्ये उल्लेख आहे. त्याच दिवशी दुपारी ३.२० मिनिटे ते ३.४० मिनिटे या काळात वाल्मिक कराडचे आरोपी विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्यामध्ये फोनवर वारंवार संभाषण झाले. जवळपास १० मिनिटे त्यांच्यात संभाषण झाल्याचा दावा एसआयटीने कोर्टात केला. विशेष म्हणजे हत्या झाली त्याच दिवशी वाल्मिक कराड याने संतोष देशमुख यांना धमकी दिली होती, असा देखील मोठा युक्तिवाद एसआयटीने कोर्टात केला.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६.०० क्विंटल | ३,१५० | ३,१९० | ३,१७० |
| ज्वारी/हायब्रिड: २२.५० क्विंटल | १,६६० | २,३४० | २,१३५ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २८०.५० क्विंटल | ६,०६० | ७,३०० | ७,१३३ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५७५ | ६,५३८ |
| बाजरी: २४.५० क्विंटल | २,५०० | ३,३५३ | २,८७९ |
| मुग : ६.०० क्विंटल | ५,५०० | ७,३०० | ६,५०० |
| सोयाबीन: २८.५० क्विंटल | ४,१३० | ४,१३५ | ४,१३२ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |

# राज्य लोकतंत्रच्या लॉयर्स डायरीचे प्रकाशन



**बीड । प्रतिनिधी**

**राज्य लोकतंत्रच्या लॉयर्स डायरीचे जिल्हा न्यायालयामध्ये मान्यवर वकिलांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले.**

गेल्या काही वर्षापासून राज्य लोकतंत्रच्या वतीने लॉयर्स डायरी प्रकाशित करण्यात येते. संपादक गणेश मोकाशे यांच्या संकल्पनेमधून पुणे जिल्हा न्यायालयातील वकिलांसह बीड जिल्हा न्यायालयातील वकिलांना या डायऱ्या मोफत देण्यात येतात. बुधवारी जिल्हा सरकारी वकील अजय राख यांच्या कार्यालयामध्ये मान्यवर वकिलांच्या उपस्थितीत लॉयर्स डायरीचे प्रकाशन करण्यात आले. तसेच यावेळी वकील बांधवांना डायऱ्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा सरकारी वकील अजय राख, सरकारी वकील वाय पी सरवदे, सरकारी वकील अजय तांदळे, सरकारी वकील अनिल तिडके, ॲड. प्रदीप मस्कर, ॲड. अमित हसेगावकर,ॲड. पी व्ही. दगडखैर, ॲड. राजेंद्र कोरडे, ॲड. जुबेर खान, ॲड. व्ही एस मिसाळ, ॲड.राजेश सानप, ॲड. ए. पी. रोकडे, ॲड. जी बी कुलकर्णी, ॲड. जे एल पठाण, ॲड. आर. एल लोखंडे,ॲड. बी एस राख, ॲड. बीबी गीते, ॲड. एस व्ही सुलाखे, ॲड. व्ही एस ढाकणे, ॲड. एस व्ही आंधळे, ॲड.ए. एन बारगजे, ॲड. जे एल पठाण, दै. लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे, दिलीप शिंगाडे, अक्षय मोरे उपस्थित होते.

cmyk



## अग्रलेख

# कामगारांचे हक्क अन् कामाचे तास...!

बहुतेक देशांत सरकारी आणि खासगी संस्थांमध्ये ८ ते ९ तास काम करण्याची संस्कृती आहे. मात्र इन्फोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्ती यांनी तरुणांनी आठवड्यातून ७० तास काम केले तर जगाच्या अर्थव्यवस्थेसोबत स्पर्धा करणे शक्य होईल असे म्हटले होते. नारायण मूर्ती यांचे मत व्यक्त झाल्यानंतर लार्सन अँड टुब्रो कंपनीचे अध्यक्ष एस. एन. सुब्रमण्यमही फॉर्मात आले. त्यांनी नारायण मूर्ती यांच्यापेक्षाही एक पाऊल पुढे टाकत कर्मचाऱ्यांनी एका आठवड्यात ९० तास काम करावे, असा सल्ला दिला. सुब्रमण्यम यांच्या वक्तव्यानंतर सोशल मीडियावर चर्चेचे पेव फुटले आहे. अब्जावधी डॉलरची कंपनी आपल्या कर्मचाऱ्यांना शनिवारीही कामावर का बोलावते असा सवाल करण्यात आला तेव्हा सुब्रमण्यम म्हणाले, मी कर्मचाऱ्यांना रविवारी कामावर बोलावू शकत नाही याचे वाईट वाटते. रविवारीही कर्मचाऱ्यांना बोलवता आले असते तर मला आनंद झाला असता. कारण मी रविवारीही काम करतो.

कर्मचाऱ्यांनी सुटीच्या दिवशी घरी थांबण्याची कल्पना फेटाळून लावताना सुब्रमण्यम म्हणाले, तुम्ही घरी बसून काय करता? बायकोकडे किती वेळ टकमक पाहू शकता? बायकोसुद्धा किती वेळ तुमच्याकडे पाहू शकते? त्यापेक्षा ऑफिसला जा आणि कामाला लागा! कंपनीच्या फायद्यासाठी सुब्रमण्यम यांची विचारधारा योग्य असेलही, परंतु माणूस म्हणजे यंत्र, मशिन नाही. त्याला विश्रांतीची गरज असते, मेंदूला आराम मिळण्यासाठी आठवड्यातून एक दिवस सुटीची गरज असते हे मालक वर्गाच्या डोक्यात कधी शिरणार? घाण्याच्या बैलासारखे माणूस काम करत राहिला तर होणारे कामही व्यवस्थित होणार नाही. बाहेर देशातील कर्मचाऱ्यांची आणि भारतातील कर्मचाऱ्यांच्या कामाची तुलनाच होऊ शकणार नाही. कारण विदेशात कमी काम आणि चांगला पगार आहे. भारतीयांना भरपूर काम करावे लागते आणि दाम मात्र कमी मिळतो. भारतीय खरोखरच किती तास काम करतात या प्रश्नाचे उत्तर देताना जागतिक कामगार संघटना म्हणते, भारतीय लोक दर आठवड्याला ४७.८ तास काम करतात तर अमेरिकेसारख्या विकसित देशातील कामगार आठवड्याला ३८ तास काम करतात. भारतीय कामगारांना दर आठवड्याला सरासरी ५० डॉलर्स (८०० रुपये) वेतन मिळते तर अमेरिकेत कामगारांना दर आठवड्याला ८६ हजार रुपये वेतन मिळते. म्हणजेच भारतात भरपूर काम करूनही कमी पगार मिळतो, तर अमेरिकेत कमी काम असूनही चांगला पगार दिला जातो. जागतिक कामगार संघटनेच्या माहितीनुसार जास्त तास काम करणाऱ्या देशांच्या यादीत भारताचा समावेश होतो. भारतीय लोक दर आठवड्याला ४७.८ तास काम करतात तर ५१ टक्के भारतीय ४९ तासांपेक्षा अधिक काम करतात. जगातील सर्वाधिक श्रीमंत देश असलेल्या 'जी-७' देशांमध्ये कामाचे तास कमी आहेत. जगातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेत आठवड्याला ३८ तास काम केले जाते. तेथे ४९ तास काम करणाऱ्यांची संख्या १३ टक्के आहे. ब्रिटनमध्ये ३५.८ तास, जपानमध्ये ३६.६ तास, जर्मनीत ३४.२ तास काम केले जाते. जगात सर्वाधिक कामाचे तास भूतानमध्ये आहेत. तेथे ६१ टक्के कामगार आठवड्याला ४९ तास काम करतात. बांगला देशात ४७ टक्के, पाकिस्तानातील ४० टक्के कामगार ४९ तासांपेक्षा जास्त काम करतात. कमी तास काम करणाऱ्या देशांत वनुआतु देशात आठवड्याला २४.७ तास, किरिबातीत २७.३ तास, मायक्रोनेशियात ३०.४ तास, रवांडा ३०.४ तास तर सोमालियात ३१.४ तास काम केले जाते. ब्राझीलमध्ये आठवड्याला ३९ तास, रशियात ३९.२ तास, चीनमध्ये ४६.१ तास, दक्षिण आफ्रिकेत ४२.६ तास काम केले जाते. 'ब्रिक्स' देशांत सर्वांत जास्त कामाचे तास केवळ भारतात आहेत.

कर्मचाऱ्यांनी आठवड्यात किती तास काम करावे याबद्दल इन्फोसिसचे नारायण मूर्ती यांनी किमान ७० तास काम करावे असे म्हटले होते. 'शार्क टँक इंडिया'चे अनुपम मित्तल यांनी सुब्रमण्यम यांच्या वक्तव्यावर मजेशीर उत्तर देताना ट्विट केले ते असे 'पण सर, जर पती-पत्नीने एकमेकांकडे पाहिले नाही तर आपण जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश कसा बनू?' अभिनेत्री दीपिका पदुकोणनेही सुब्रमण्यम यांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली. महिंद्रा ग्रुपचे आनंद महिंद्रा म्हणाले, हा वाद चुकीच्या दिशेने जातोय. मी नारायण मूर्ती आणि सुब्रमण्यमचा आदर करतो, पण माझे असे म्हणणे आहे की, आपण कामाच्या तासांपेक्षा कामाच्या गुणवत्तेवर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. आपण कामाच्या गुणवत्तेवर अधिक लक्ष केंद्रित केल्यास त्याचा संबंध ७० ते ९० तास काम करण्याशी येणार नाही. आनंद महिंद्रा यांनी व्यक्त केलेले मत अतिशय महत्त्वाचे आहे. कामगार वर्गानेही त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. 'सीरम'चे अदर पूनावाला यांनीही आनंद महिंद्रांच्या सूचनेला दुजोरा दिला आहे. सर्वसामान्य कर्मचारीसुद्धा आठवड्याच्या सुटीबद्दल म्हणेल, आठवड्याच्या सुटीचा आनंद काय असतो ते 'तुम क्या जानो सुब्रमण्यम बाबू'? अत्याधुनिक यंत्र-तंत्रासह सुसज्ज कंपनीत काम करणारे उच्चाधिकारी आर्थिकदृष्ट्या संपन्न असले तरी मनाने 'आधुनिक' असतीलच असे नाही.

# विद्यार्थ्यांनी डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक विचाराचा अंगीकार करावा-प्रा.विनोद किर्दक



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान.. महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा एकतीसावा नामविस्तार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक विनोद सर व्यासपीठावर माजी प्राचार्य डॉक्टर सय्यद एस आर माजी प्राचार्य डॉक्टर सुनील जाधव सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक रामकृष्ण प्रधान यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला सर्वप्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाची विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर लोखंडे बी बी यांनी केले त्यांनी आपल्या प्रस्ताविक पर विचारात डॉक्टर बाबासाहेबांनी जागतिक कीर्तीचे शैक्षणिक तज्ञ असून या विद्यापीठाला डॉक्टर बाबासाहेबांचे नाव आहे हे आपलं भाग्य आहे असे प्रस्ताविक पर उद्गार काढले तर महाविद्यालयाचे न्याक समन्वयक प्राध्यापक विनोद सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार राजकीय सामाजिक विचाराची मांडणी करून एखादी विद्यापीठ भौगोलिक नावापेक्षा एखाद्या शैक्षणिक विद्वानाच्या नावाने ओळखले जावे अशी भूमिका मांडली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक योगदान या अतिशय महत्त्वाची असून त्यांच्या एक शैक्षणिक योगदानाचा विद्यार्थ्यांनी अंगीकार करावा आणि आपले भविष्य उज्वल करावे विद्यापीठाचे नावलौकिक करण्यासाठी प्राध्यापक विद्यार्थी पालक यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांनी आपली भूमिका यशस्वी करण्याचे आव्हान त्यांनी केले समाजशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर सुनील जाधव सर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले हिंदी विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर श्रेयस सर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख डॉक्टर रामकृष्ण प्रधान यांनी केले या कार्यक्रमाचे आभार इंग्रजी विभागाची विभाग प्रमुख प्राध्यापक संदीप यांनी केले विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले.

# मनोज जरांगे,आ.धस,खा.सोनवणे,आ.सोळंके,आ.क्षीरसागर यांची बदनामी केल्याने त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक



**आष्टी । पतिनिधी**

**स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करणारे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील,अन्याया विरुद्ध वेळोवेळी आवाज उठवणारे आ.सुरेश धस,खा.बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेवर जोडे मारो आंदोलन करून या नेत्यांची बदनामी केली असल्याने पुणे,बीड जिल्ह्यासह विविध ठिकाणी या नेत्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून प्रत्युत्तर देण्यात आले आहे.**

काल परळी शहरात चौकशीअंती वाल्मिक कराड याला मकोका या कायद्यान्वये विशेष चौकशी समितीने ताब्यात घेतल्यामुळे वाल्मीक कराड समर्थकांकडून बीड जिल्ह्यात संचारबंदी कायदा १४४ लागू असतानाही आरोपींच्या बाजूने चुकीच्या पध्दतीने समर्थन करून आरोपीना शिक्षा व्हावी ही सतत मागणी करणाऱ्या नेत्यांच्या प्रतिमेला काळे फासून निषेध व्यक्त करत जोडे मारो आंदोलन केले आणि या निंद्य प्रकाराचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून या सर्व नेत्यांची बदनामी केल्यामुळे स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणी अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सर्व सर्वसामान्य लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. काल परळी मध्ये जो निंदनीय प्रकार आरोपीच्या समर्थनार्थ घडला असून सर्व दोषींवर योग्य ती काय कायदेशीर कठोर कारवाई करावी यापुढेही असा प्रकार होणार नाही.या मागणीसाठी आष्टी मतदार संघातील सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येत निषेध व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच जिल्ह्यात विविध ठिकाणी संघर्षयोद्धा मनोज जरांगे, आ.सुरेश धस, खा. बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या अशा घोषणाबाजी करत अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या नेत्यांना समर्थन दिल्याचे पाहायला मिळाले. यावेळी आष्टी पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक श्री शरद भुतेकर यांना आणि आष्टी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री बाळकृष्ण पाटील हणपुडे यांच्याकडे मनोज रंगे पाटील आमदार सुरेश धस खासदार बजरंग सोनवणे आमदार प्रकाश सोळंके आणि आमदार संदीप क्षीरसागर यांची बदनामी करणाऱ्या या व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी या मागणीचे स्वाक्षऱ्या केलेले.

## रामभाऊ खडके यांचे निधन

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अवधूत नाना खडके यांचे वडील रामभाऊ देवराव खडके यांचे १४ जानेवारी २०२५ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर आज १५ जानेवारी २०२५ रोजी अंबड तालुक्यातील आंतरवाला ( आवा ) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. श्री.अवधूत नाना खडके ( सभापती ,कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबड ) यांचे ते वडील होते. श्री. अवधूतनाना रामभाऊ खडके, कल्याण खडके, संतोष खडके असा तीन भाऊ आहे.



# माजलगाव तालुक्यातील शेतकरी आला मेटाकुटीला

## केवायसी झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान द्या; अन्यथा आंदोलन करणार-भाई थावरे

**माजलगाव**

**तालुक्यातील शेतकरी आस्मानी, सुल्तानी संकटामुळे मेटाकुटीस आला असुन सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीचे अनुदान जिल्हाधिकारी कार्यालयात पडुन आहे. तालुक्यातील बहुतांशी शेतक-यांनी केवासयी केली असुन अद्यापही त्यांना पैसे मिळत नाहीत. त्यामुळे हे अनुदान तात्काळ त्यांच्या खात्यावर जमा करावे अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी नेते गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.**

खरिप हंगाम २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने खरिप पिकांचे प्रचंड नुकसान होउन शेतक-यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावुन घेतला. परिणामी उत्पन्नावर मोठा परिणाम झाला असुन अत्यल्प असे उत्पादन शेतक-यांच्या हाती आले आहे. त्यातही शेतक-यांच्या कापुस, सोयाबीनचे पडलेले दर मात्र जैसे थे असुन कापसाच्या हमीभाव देखील शंभर रूपयांनी कमी करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाने याचा विचार करून कापुस, सोयाबीनची दरवाढ करावी अशी मागणी होत आहे. असे असले तरी अत्यल्प कमी दरात कापुस, सोयाबीनची खरेदी होत असल्याने शेतक-याचे नुकसान होत आहे. त्याचबरोबर खरिप हंगामात सप्टेंबर महिण्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीने कपाशी, सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नुकसान भरपाई पोटी शासनाने निधी मंजुर केलेला असुन हा निधी जिल्हाधिकारी कार्यालयात आलेला आहे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासनास हा निधी मंजुर वाटप करण्यास वेळ नाही. तालुक्यातील बहुतांशी शेतक-यांनी केवायसी करून १० ते १२ दिवस उलटले तरीही पैसे खात्यात जमा होत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे तात्काळ हे पैसे जमा करावेत अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तिव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.



# जिल्हाध्यक्ष आकात यांनी केला पो.उप निरीक्षक काळे यांचा सत्कार



**परतूर । प्रतिनिधी**

पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल रोहित काळे या विद्यार्थ्यांचा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपील आकात यांनी परतुर येथे केला सत्कार . रोहित काळे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरिक्षक निवड चाचणी परीक्षा दिली होती. या परीक्षेत तो चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला आहे. या यशाबद्दल राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष कपिला आकात यांनी त्याचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगराध्यक्ष विनायक काळे, नगरसेवक विजय राखे, अखिल काजी, सय्यद आरेफ अली, कदिर भाई कुरेशी, नासेर चाऊस, रज्जाक कुरेशी, संजय राऊत, युवकचे शहराध्यक्ष राजेश तेलगड यांची उपस्थिती होती.

## पान १ वरून...

### संतोष देशमुख यांच्या

हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याला बीड कोर्टात बुधवारी हजर करण्यात आले. यावेळी सीआयडीने कोर्टात जवळपास ९ महत्त्वाचे मुद्दे मांडले. यातील महत्त्वाचा मुद्दा आता समोर आला आहे. अवदा कंपनीकडून खंडणी मिळवताना संतोष देशमुख हे अडथळा ठरत होते. त्यामुळे त्यातूनच त्यांची अपहरण करुन हत्या करण्यात आल्याचा मोठा दावा सीआयडीने कोर्टात केला. संतोष देशमुख यांची नेमकी हत्या का झाली? ते आतापर्यंत स्पष्ट होत नव्हते. सुदर्शन घुले याला ६ डिसेंबरला जी मारहाण झाली होती त्याचा बदला म्हणून संतोष देशमुख यांची हत्या केली का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. मात्र, सीआयडीने वाल्मिक कराडच्या रिमांड रिपोर्टमध्ये मोठा दावा केला आहे. संतोष देशमुख खंडणी प्रकरणात अडथळा ठरत होते, त्यामुळे आरोपींनी त्यांची कट रचून हत्या केली, असे सीआयडीने वाल्मिक कराडच्या रिमांड रिपोर्टमध्ये लिहिल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकारी वकिलांनी यावेळी वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल का केला? याची देखील माहिती कोर्टात दिली. सरकारी वकिलांनी वाल्मिक कराडवर याआधी दाखल झालेल्या विविध गुन्ह्यांची माहिती कोर्टात सादर केली आणि त्याच आधारावर वाल्मिक कराडवर मकोका म्हणजे संघटीत गुन्हेगारीच्या कलमांतर्गत गुन्हा दाखल केल्याचे स्पष्ट केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद, सीआयडी, एसआयटीची भुमिका ऐकल्यावर न्यायालयाने पुढील तपासासाठी वाल्मिक कराड यांना २२ फेब्रुवारीपर्यंत एसआयटी कोठडी सुनावली आहे.

**कृष्णा आंधळेला लपवण्यात हात कोणाचा?**

विष्णू चाटे, सुदर्शन घुले आणि वाल्मिक कराड यामध्ये इंटरलिंक्स काय आहेत? याचा तपास सुरू आहे. फार आरोपी अजून सापडायचे आहेत. कृष्णा आंधळे याला लपवण्यात यांचा हात आहे का? याची माहिती घ्यायची आहे. घुले आणि चाटे अनेक दिवस फरार होते. त्यांना कोणी मदत केली? याची माहिती घेणे सुरू आहे, असे सरकारी वकील कोर्टात म्हणाल्याची माहिती समोर येत आहे.

**वाल्मिक कराडवर हत्येचा गुन्हा लागू होऊच शकत नाही आरोपीच्या वकिलाचा नेमका दावा काय?**

कोर्टात वकील अशोक कवडे आणि सिद्धेश्वर ठोंबरे या दोघांनी वाल्मिक कराडाची बाजू कोर्टात मांडली. वाल्मिक कराडची अटक बेकायदेशीर आहे, असा युक्तीवाद वाल्मिक कराडच्या वकिलांनी केला आहे. कुठल्याही आरोपीने वाल्मिक कराडचे नाव घेतले नाही. वाल्मिक कराड विरोधात कुठलाही ठोस पुरावा नाही. त्यामुळे वाल्मिक कराडवर हत्येचा गुन्हा दाखल होऊ शकत नाही. वाल्मिक कराड यांची अटक बेकायदेशीर आहे, असा मोठा दावा आरोपींच्या वकिलांनी केला. सिद्धेश्वर ठोंबरे यांनी व्हिडिओ कॉन्फर्न्सिंगद्वारे वाल्मिक कराड यांच्यासाठी युक्तिवाद केला.

**दोन मुद्यांमुळे वाल्मिक कराडच्या अडचणी वाढल्या**

एफआयआरमध्ये संतोष देशमुख यांच्या अपहरणातील वेळ आणि आता या तीन आरोपींमधील संभाषणाची वेळ मिळती जुळती असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे वाल्मिकचा पाय आता अधिक खोलात गेला आहे.

**पिंपरी चिंचवड महापालिकेचा वाल्मिक कराडला दणका**

उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरात देखील वाल्मिक कराड आणि त्याच्या पत्नीच्या नावे वाकडमधील पार्क स्ट्रीट सोसायटीच्या आयव्हरी इमारतच्या ६ व्या मजल्यावर ६०१ नंबर चा ३.१५ कोटीपेक्षा अधिक किमतीचा ४ बीएचके फ्लॅट असल्याचे समोर आले. धक्कादायक बाब म्हणजे कराडने या त्याचा फ्लॅटचा पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मिळकत कर न भरल्यामुळे कर संकलन विभागाने त्याच्या या फ्लॅट वर नोटीस सुद्धा लावली आहे. वाकडमधील कराडचा फ्लॅट महापालिका जप्त करणार आहे, अशी माहिती समोर आली आहे.

---------

### एसआयटी आणि सरकारी

आरोपींनी मदत केली आहे का? हे तपासायचे आहे. तीन आरोपींमध्ये १० मिनिटे नेमके काय संभाषण झाले हे तपासायचे आहे. वाल्मिक कराडच्या विदेशातील मालमत्तेबाबत चौकशी सुरू आहे. आरोपी विष्णू चाटे, सुदर्शन घुले आणि वाल्मिक कराड यामध्ये इंटरलिंक्स काय आहेत का? याचा तपास सुरू आहे. फार आरोपी अजून सापडायचे आहेत. कृष्णा आंधळे याला लपवण्यात यांचा हात आहे का? याची माहिती घ्यायची आहे. घुले आणि चाटे अनेक दिवस फरार होते. त्यांना कोणी मदत केली? याची माहिती घेणे सुरू आहे.

------------

### शक्तिपीठ महामार्गावरून शेतकरी

जोडण्यात येणार आहेत, असा राज्य सरकार सरकारचा दावा आहे. त्यासाठी ८६ हजार कोटींचा खर्च येणार आहे. राज्य सरकारचा सर्वात मोठा प्रकल्प अशी त्याची जाहिरात राज्य सरकार करत आहे. पण याच महामार्गाच्या विरोधात कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात शेतकऱ्यांनी आंदोलन केली. यातून राज्यभरातून जोरदार विरोध झाला. लोकसभा निवडणुकीत तर या महामार्गाचे प्रकरण महायुतीला भोवले देखील. लोकसभा निवडणुकीत भाजपच्या जागा कमी झाल्या. परंतु राज्य सरकारने तरीही महामार्ग रद्द करण्याबद्दल शब्दही उच्चारला नाही. मात्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रकल्पाला शेतकऱ्यांनी टोकाचा विरोध केला. विरोधाचा ज्वाला कोल्हापूर आणि सांगलीत अधिक असली तरी उर्वरित १० जिल्ह्यातही या आंदोलनाची धग पोहचलेली होती. त्यामुळे पुन्हा लोकसभा निवडणुकीसारखाच झटका बसतो की, काय अशी चिन्हं महायुतीला दिसले. त्यामुळे सप्टेंबर २०२४ मध्ये भूसंपादनाची अधिसूचना रद्द करण्यात आली. तरीही शेतकऱ्यांचा विरोध मावळला नाही. कोल्हापूर जिल्ह्यात तर महायुतीच्या नेत्यांना शेतकऱ्यांनी कोंडीत पकडले. शेवटी १५ ऑक्टोबर २०२४ म्हणजे निवडणूक आचारसंहितेच्या तोंडावर एक अधिसूचना काढत राज्य सरकारने या शक्तिपीठमधून कोल्हापूर जिल्ह्याला वगळले आणि शक्तिपीठच्या मुद्द्यावर तात्पुरता पडदा टाकण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु आता मात्र ११ जिल्ह्यातून हा महामार्ग शेतकऱ्यांशी चर्चा करून सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

-----------

### कोर्टाबाहेर कराड-देशमुख

गोल्डे यांनी जमाव पांगवण्याचा प्रयत्न केला. मात्र जमावाने गोंधळ घातल्याने यांतील पाज जणांना पोलिसांनी पकडून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आणले. यात कराड समर्थक सुनिल श्रीरंग फड (रा. परळी), ज्ञानोबा दगडुबा मुंडे (रा. उखळी, ता. गंगाखेड), जीवन माणिक कराड (रा. पिराचीवाडी, ता. केज) यांचा समावेश आहे. या तीघांसह ३० ते ३५ जणावर शासकीय कामात आडथळा आणल्या प्रकरणी सहाय्यक पो.नि.विलास मोरे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तर देशमुख समर्थक ॲड. हेमाताई पिंपळे, मनिषा कुपकर, संगिता कोकाटे यांच्यासह १० ते १२ महिला यांच्या विरोधात शासकीय कामात आडथळा आणल्याप्रकरणी पो.उपनिरीक्षक निता दामधर याच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे.

**वाल्मिक कराडच्या मूळ गावी आंदोलन**

कराडला कोठडी सुनावल्यानंतर त्याचं मूळगाव असलेल्या पांगरीत महिला आणि समर्थक आक्रमक झाले. त्यांनी थेट राष्ट्रीय महामार्गावरच ठिय्या मांडत, घोषणाबाजीला सुरुवात केली. यावेळी काही महिलांनी अंगावर रॉकेल ओतून घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी वेळीच त्यांना अटकाव केला. तर काही महिलांनी आक्रोश करत अन्याय होत असल्याचा आरोप केला. याशिवाय कराड समर्थकांनी रस्त्यावर टायर पेटवून रास्तारोको करण्याचा प्रयत्म केला.

----------

### तणाव निवळावा यासाठी गृहमंत्र्यांशी

यावरून निशाणा साधला आहे. त्याचवेळी त्यांच्या बहीण आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी मात्र या सर्वापासून स्वतःला दूर ठेवल्याचे दिसून येत आहे. बीडमध्ये जे काही सुरू आहे त्याबद्दल मला काहीच माहिती नाही. मी माझ्या रोजच्या नियोजनाप्रमाणे काम करत आहे. त्यामुळे या गोष्टी माझ्यासाठी आता मॅटर करत नाहीत. माझ्यासाठी रोजचे काम महत्त्वाचे आहे अशी पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली. बीडमध्ये सध्या जो तणाव निर्माण झाला आहे त्यावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांसोबत चर्चा करणार असल्याचे पंकजा मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले.

--------------

### शेतकरी नेते डल्लेवालांचे ५१ व्या दिवशीही

केली आहे. त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. आधीच त्यांना बोलायला त्रास होत होता. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, त्यांचे शरीर आता पाणीही पचवू शकत नाही. सरकारी आणि खासगी डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर लक्ष ठेवून आहेत. तरीही डल्लेवार मात्र, ठाम आहेत. त्यांनी वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिला आहे. पंजाब सरकारने आमरण उपोषण स्थळाजवळ तात्पुरते रुग्णालय आणि रुग्णवाहिका तैनात केली आहे. जेणेकरुन कोणत्याही अनुचित परिस्थितीला तोंड देता येईल. मात्र, डल्लेवाल वैद्यकीय सेवा घेत नाहीत.

-------

### विद्यार्थ्यांचा गळा

किरकोळ कारणावरून वाद झाला होता. या वादावेळी 'तू एकटक का पाहतोस?, कॉलर का उडवतोस? अशा कारणांवरून वाद होऊन हाणामारी झाली होती. संक्रांतीच्या रात्री प्रदीपचे मित्र बाहेर गेले असताना मारेकऱ्यांनी फ्लॅटमध्ये घुसून त्याची गळा चिरून हत्या केली. ही धक्कादायक घटना मंगळवारी रात्री साडेअकरा वाजता उस्मानपुऱ्यात उघडकीस आली. प्रदीप देवगिरी महाविद्यालयात बीसीएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत होता. तो आपल्या एका मावसभावासह अन्य तीन मित्रांसोबत भाजीवालीबाई पुतळ्याजवळील एका अपार्टमेंटमध्ये भाड्याने राहत होता. मंगळवारी सर्वजण महाविद्यालयातून फ्लॅटवर परतले होते. सायंकाळी त्याचा भाऊ आणि अन्य मित्र बाहेर गेले होते, परंतु प्रदीप मात्र फ्लॅटवर थांबला होता. रात्री १० वाजता त्याचे भाऊ आणि मित्र परतले, तेव्हा त्यांनी प्रदीपला गळा कापलेल्या आणि रक्तबंबाळ अवस्थेत मृत पाहिले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी गुन्ह्याचा तपास सुरू केला आहे. हत्येमागील कारणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून अधिक सखोल चौकशी केली जात आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. १६ जानेवारी २०२५
३

## ब्रह्मसखी महिला मंडळाचे हळदी-कुंकू संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील ब्रह्मसखी महिला मंडळाच्या वतीने मकरसंक्रांतीनिमीत्त एकत्रीत हळदी - कुंकू कार्यक्रमाचे आयोजन दि. १५ बुधवारी वैष्णवी मंगल कार्यालयात करण्यात आले असुन शहरातील महिला - भगिनींनी हळदी - कुंकूवास मोठ्या प्रमाणात हजेरी लावली.

शहरामध्ये मागील तिन वर्षांपासुन ब्रह्मसखी महिला मंडळ हे सामाजिक उपक्रम राबवितात तर उपनयन संस्कार कार्यक्रमामध्ये देखील उत्स्फुर्त सहभाग असतो. यावर्षी मकरसंक्रांतीनिमीत्त पहिल्यांदाच शहरातील ३६९ महिलांनी एकत्रीत येवुन हळदी - कुंकू कार्यक्रमाचे आयोजन वैष्णवी मंगल कार्यालयात बुधवारी दु. ३.०० ते सायं. ८.०० पर्यंत करण्यात आले असुन या कार्यक्रमास महिला - भगिनींनी उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे. ब्रह्मसखी महिला मंडळाचे हळदी - कुंकूवासोबतच महिलांसाठी सेल्फी पॉईंट विवीध प्रकारचे आधुनिक खेळ याठिकाणी आयोजित केले आहेत.

# माहिती व तंत्रज्ञानाचा बदल लक्षात घेता सर्व नागरिकांनी ऑनलाईज अर्ज भरावेत -राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. जाधव

बीड । प्रतिनिधी

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात झपाटयाने झालेला बदल पाहता आपल्या कामाचा निपटारा लवकर होण्याच्या दृष्टीने व शासकीय कामात पारदर्शकता यावी यासाठी तंत्रज्ञानाचा अधिक वापर करुन नागरिकांनी ऑनलाईन अर्ज भरावेत, असे वक्तव्य राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात विविध विभागाच्या आढावा बैठकी प्रसंगी केले.



यावेळी ते म्हणाले की, आपले सरकार सेवा केंद्राच्या ठिकाणी नागरिकांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी तिथे कोण कोणते कामाचे फॉर्म ऑनलाईन भरल्या जातात त्यासाठी दर्शनी भागात बोर्ड लावून त्यावर सर्व माहिती मराठीत लिहून ठेवावी, तसेच तिथे पिण्यासाठी स्वच्छ पाणी, तक्रार पेटी, विहीरीसाठी अनुदान बाबत माहिती , इतर सुविधा असायला हव्यात, या केद्रांची संबधित अधिका-यांनी वेळो-वेळी तपासणी करुन त्यांना सूचना द्याव्यात.

जिल्हयात ३८ विभाग आहेत ज्या विभागातील अपिलीय अधिका-यांनी ऑनलाईन पध्दतीने चांगली कामे केली आहेत त्या अधिका-यांचा २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्र्याच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी संबधित विभागाला दिल्या.

आपले सरकार सेवा केंद्रातील अधिकच्या माहितीसाठी शाळा व महाविद्यालयामध्ये तसेच कॅम्प घेऊन विद्यार्थ्यांना माहिती होईल, आपल्या हक्काची पायमल्ली होऊ नये यासाठी ग्रामसेवक,तलाठी, मंडळ अधिकारी यांनीही स्वत:च्या प्रोफाईलवरुन अर्जाचे अपिल करण्याकडे लक्ष द्यावे. आपले सरकार सेवा पोर्टल महाराष्ट्र हे पहिले राज्य होते, पण ते आता २६ क्रमांकावर आहे, हे पोर्टल गतिमान करुन अधिक सक्रीयतेने व सुलभरित्या व्यापक स्वरुपात नागरिकांना जास्तीत जास्त प्रमाणात सुविधा देण्यासाठी संबधित विभागाने प्रयत्न करावेत असेही डॉ. जाधव यावेळी म्हणाले.

बीड जिल्हयातील सन २०२३- २०२४ च्या झालेल्या कामाबद्दल डॉ.जाधव यांनी समाधान व्यक्त केले तसेच २०२५ च्या कामात शासन अधिक गतीने प्रलंबित कामाचा निपटारा करतील अशी आशाही त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

या बैठकीस अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी, अधिकारी आदित्य जीवने, अपर जिल्हाधिकारी ( सामान्य प्रशासन) चे शैलेश सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी, इंगोले, उपविभागीय अधिकारी लाटकर, तहसीलदार चंद्रकांत शेळके विविध विभागाचे संबधित अपिलीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# सीईडी इंडिया फाउंडेशनच्या ५ स्टार रँकिंग पुरस्काराने न्यू व्हिजन पब्लिक स्कूल सन्मानीत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू व्हिजन पब्लिक स्कुल या शैक्षणिक संस्थेस इंडिया फाउंडेशन यांच्या द्वारे देण्यात येणारा शैक्षणिक संस्था साठी अत्यंत मानाचा व प्रतिष्ठेचा मानला जाणारा २०२४-२५ चा ५ स्टार रँकिंग ++ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नुकताच दि १२ जाने रोजी रेडिसन ब्लू हॉटेल ,नवी दिल्ली येथे हा पुरस्कार पदमश्री प्रो डॉ दिनेश सिंग (चान्सलर, के आर मंगलम युनिव्हर्सिटी, हरियाणा) व डॉ श्रीधर श्रीवास्तव (सहसंचालक एन सी ई आर टी) यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरित करण्यात आला. हा पुरस्कार न्यू व्हिजन पब्लिक स्कुलचे प्राचार्य रेंजो आर चंद्रन यांनी स्वीकारला.

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल अंबाजोगाईच्या वतीने सदैव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारचे शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील असते . त्यासाठी आवश्यक सर्व त्या भौतिक तथा शैक्षणिक सुविधा पुरविल्या जातात. विद्यार्थ्यांमध्ये समाज जागृती व प्रगती व्हावी या हेतूने सतत संस्था प्रयत्नशील असते . संस्थेचे नाव राष्ट्रीय पातळीवर पोचावे यासाठी संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्यासोबतच संस्थेचे प्राचार्य तथा सर्व




शिक्षक हे मेहनत घेत असतात. याचेच फलित म्हणून आज न्यू व्हिजन पब्लिक स्कूलला ( ) सी ई डी इंडिया फाउंडेशन यांच्याद्वारा देण्यात येणारा अत्यंत महत्त्वाचा व प्रतिष्ठेचा असा स्टार रँकिंग ॲवार्ड २०२४-२५ साठी ५ स्टार रँकिंग ++ हा पुरस्कार प्राप्त झाला. रेडिसन ब्लू हॉटेल नवी दिल्ली येथे सन्मानपूर्वक देण्यात आला . संस्थेतून आपले शिक्षण पूर्ण करून आजपर्यंत शेकडो विद्यार्थी देशभरात मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. ज्यामध्ये डॉक्टर, इंजिनिअर, वैज्ञानिक याचबरोबर मोठ्या उद्योग धंद्यात आपले , आपल्या संस्थेच्या सोबतच देशाचे नाव उज्वल करत आहेत. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने निवासी मतिमंद, मूकबधिर तथा दिव्यांग विद्यालय तसेच मातोश्री वसतिगृह त्याचबरोबर घाट नागनाथ प्राथमिक विद्यालय, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय , फार्मसी महाविद्यालय, बी सी ए महाविद्यालय या व अशा विविध शैक्षणिक संस्था अंबाजोगाई शहरात हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत.

या पुरस्कारासाठी संपूर्ण देशभरातून १४५६ शाळांनी आपला सहभाग नोंदवला होता. यापैकी १०३ शाळांना ग्रीन स्कूल या कॅटेगरी मध्ये हा पुरस्कार मिळाला . या पुरस्कारा साठी शाळेची निवड करतांना शाळेचा मागील तीन वर्षाचा एकूण निकाल , शाळेची इमारत, शाळेतील शैक्षणिक सुविधा व त्यांचा वापर , निसर्गरम्य परिसर , शाळेचे क्रिडांगण इत्यादी मानदंडाचा विचार करून संस्थांची निवड करण्यात आली . या पुरस्कार प्राप्तीसाठी संस्थेचे संस्थापक राजकीशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी , मार्गदर्शक डॉ .डि.एच. थोरात ,प्रा. वसंत चव्हाण , डॉ . बी . आय . खडकभावी , प्रा सुरेश बिराजदार , यांनी संस्थेचे प्राचार्य रेंजू आर चंद्रन , संस्थेचे सर्व शिक्षक , विद्यार्थी, पालक यांचे अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त एमकेसीएलच्या वतीने ऐतीहासीक किल्ल्यात स्वच्छता अभियान

किल्लेधारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरातील इतिहासिक किल्ल्यात राजमाता जिजाऊ जयंती निमीत्त महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमेटेड च्या वतीने धारूर येथील ऐतीहासीक किल्ले स्वछता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धारूर शहरातील एमएस-सीआयटी केंद्र व सारथीचे विद्यार्थ्यानी व शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणे सहभाग घेतले.

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमेटेड हे संस्था गेल्या २२ वर्षा पासून आयटी क्षेत्रात अग्रेसर आहे. यासंस्था मार्फ़त विविध प्रकाराच्या सामाजीक व शैक्षणिक कार्य केले जातात. यावर्षी राजमाता जिजाऊ जयंती निमित्त इतिहासिक '' किल्ले स्वछता अभियान'' चे आयोजित करण्यात आले. यात महाराष्ट्रतील




जेथे केल्ले तेथे स्वछता असे उपक्रम आयोजित केले होते. राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त एमकेसीएलचा पुढाकार घेत किल्ले धारूर येथे किल्ल्यांच्या स्वच्छतेची मोहीम राबवण्यात आली. या अभियानाला काही महत्त्वाच्या व्यक्तींच्या विशेष मार्गदर्शनाखाली सुरुवात झाली. स्वच्छता मोहिमेच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून सारथीचे व्यवस्थापकीय संचालक (भा.प्र.से.) अशोक काकडे तसेच लातूर विभागीय कार्यालयाचे उपव्यवस्थापकीय संचालक तथा उपजिल्हाधिकारी राहूल जाधव आणि लातूर विभागीय कार्यालयाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती ज्योती ढगे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. ही स्वछ्टता मोहीम बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील ऐतिहासिक किल्ले धारूर येथे राबवण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून निसर्ग, इतिहास आणि स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करत तरुण पिढीला प्रेरित करण्यात आले. पर्यावरणपूरक दृष्टीकोन आणि ऐतिहासिक वारसाचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने राबवलेली ही मोहीम प्रेरणादायी ठरली. तसेच एमकेसीएल बीड जिल्हा समन्वयक विठ्ठल पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक सेंटर समन्वयकांनी मोहीम यशस्वीरीत्या पार पाडली. या उपक्रमामुळे किल्ल्याच्या स्वच्छते बरोबरच सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला गेला. किल्ले धारूर स्वच्छता मोहिमेने ऐतिहासिक ठिकाणांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी सर्वांना एकत्र येण्याची प्रेरणा देण्यात आली. राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त राबवलेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला. या उपक्रमात धारूर शहरातील एमएस-सीआयटी केंद्र डिस्कव्हरी कंप्यूटर्स, श्रीनाथ कंप्यूटर एजुकेशन व वैष्णवी कंप्यूटरचे संचालक व सारथीच्या विद्यार्थ्यानी किल्ले स्वछता अभियान सहभाग नोंदवीला.

पान ६ वरून...

### खा. काळे यांनी रेल्वे प्रशासनाला

सकाळी १०.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७१०२ पटणा ते औरंगाबाद विशेष गाडी पटणा येथून दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ आणि २७ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १५.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच औरंगाबाद येथे अनुक्रमे दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ आणि दिनांक २९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०७.४५ वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.गाडी क्रमांक ०७१०३ काचीगुडा ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी काचीगुडा येथून दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १६:४५ वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, , इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसर्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७१०४ पटणा ते काचीगुडा मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच काचीगुडा येथे दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ सकाळी ०७:०० वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील. गाडी क्रमांक ०७१०५ सिकंदराबाद ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी सिकंदराबाद येथून दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळ १७.०० वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, , इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसर्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.गाडी क्रमांक ०७१०६ पटणा ते सिकंदराबाद मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १५:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच सिकंदराबाद येथे दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११:३० वाजता पोहोचेल. या गाडीत २० डब्बे असतील.सर्व गाड्यांचे वेळापत्रक यासोबत जोडलेले आहे सर्वांनी या सेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केले आहे.

पान ६ वरून...

### वाढीव घरपट्टी व नळपट्टीबाबत

स्वरूपात दिल्या या सर्व तक्रारीचे दखल घेऊन मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्याशी मोबाईलद्वारे संपर्क साधून मोहनराव जगताप यांनी दोन दिवसात नगरपालिकेत नागरिकांसोबत बैठक आयोजित करण्याची सूचना दिल्या सर्व समस्या त्यांच्यासमोर मांडून व नागरिकांच्या समस्यांचे निराकरण न झाल्यास याबाबत पुढील दिशा आपण ठरवू असं बैठकीमध्ये मोहनराव जगताप यांनी नागरिकांना आश्वासित केले. या बैठकीला शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.

### नागपूर येथील सुवर्णा

महिलांसमोर मांडली व '' एक पंथ दो काज '' या उक्तीप्रमाणे सुवर्णा ताईंनी सामाजिक व धार्मिक ईष्ट, अनिष्ट रुढी परंपरांना सामोरे जात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा व प्रचार- प्रसाराचा डौल साधला. त्यांच्या या उल्लेखनीय कार्यासाठी भिम आर्मी, पि.ए.फाऊंडेशन, ब्ल्यू डायमंड या संस्थांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला व नागपूर नगरीत विदर्भ गौरव तसेच संभाजीनगर येथे राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तद्वतच दादासाहेब फाळके चित्रपट युनियन कडून त्यांची नागपूर जिल्हा सचिव पदी नियुक्ती करण्यात आली.

सुवर्णा ताईंच्या या समाज कार्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभूनही त्या एवढ्यावरच थांबल्या नाहीत तर त्यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाकडे लक्ष पुरविले.आणि १५ महिलांना आपल्या ट्रेडिशनल कार्यात सहभागी करून त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे काम केले आहे. त्यांनी आपल्या या कार्याला अधिक प्रभावी बनविण्यासाठी कला क्षेत्राचा देखील सहारा घेतला. डाक्युमेंट्री,बाबुजी एक संघर्ष गाथा, आशा , अजून वेळ आहे, चलचित्रीत महानुभाव भक्तिगीते, मानवंदना पथनाट्य, नाटक ( गण गण गणात बोते) अशा विविध लघुचित्रपटात वेगवेगळ्या स्त्री भुमिका त्यांनी निभावल्या किंबहुना शासकीय जनजागृती अभियानात '' गर्भधारणा सुरक्षा '' , जिल्हाध्यक्ष कार्यालय नागपूर येथे मतदार जागृती नाट्याचे सादरीकरण केले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना राष्ट्रीय पातळीवरील समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

### राष्ट्रीय युवा दिन्न युवा

अरविंद विद्यागर, क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार, शरद आंदुरे, संतोष सुरवसे, आयुब शेख, यांची प्रमुख उपस्थितीत स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून्न पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी डॉ. अविनाश बारगजे, प्रा. तानाजी आगळे, प्रा, गोपाळ धांडे, प्रा, दिनकर थोरात यांन्नी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जिवनावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कुराष्ट या खेळात राष्ट्रीय स्तरावर सहभाग घेवून प्रावीण्य मिळवलेल्या कु. गौरी शेळके ( सिल्व्हर मेडल ), स्वराज सुरवसे ( ब्रांझ मेडल ) यांचा पुष्पगुच्छ देवून्न उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले, सुत्रसंचलन श्रीमती शिवशाला ढाकणे यांन्नी केले तर कार्यक्रमाचे आभार मुख्याध्यापक विशाल सुपेकर यांनी मानले.

### पैसे नसल्याने गावाकडे

करण्याचा सल्ला दिला. कटारे यांनी तातडीने संभाजीनगर गाठले. तेथील डॉक्टरांनी उपचारासाठी मोठा खर्च सांगितला, तसेच ताबडतोब ५० हजार रुपये काऊंटरला जमा करण्याचे सांगितले. परंतु पेशंटच्या नातेवाईकाकडे पैसे नसल्यामुळे ते पेशंटला गावाकडे घेऊन परत आले. पत्नीचा जीव वाचविण्यासाठी कैलासने मोटारसायकल विक्री काढली. तसेच अनेकांकडे उसने पैसे मागितले, मात्र यश आले नाही. जसजसा काळ जात होता तसतशी आरतीची तब्येत वरचेवर बिघडत चालली होती. कोणीतरी त्यांना देवदूत डॉ.

ओमप्रकाश शेटे यांना भेटण्याचा सल्ला दिला. त्यातच कैलास कटारे यांची पत्रकार गणेश काटकर व नागेश वकरे यांची भेट झाली. कैलासने त्यांना सर्व आपबिती सांगितली.

गणेश काटकर यांनी लागलीच देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांना फोन करून पेशंटची परिस्थिती सांगितली. त्यांनी सांगितले की, तुम्ही पैशाची चिंता करू नका पेशंटला घेऊन संभाजीनगर येथील सिग्मा हॉस्पिटलला घेऊन जा. डॉ.शेटे यांनी डॉ.उन्मेष टाकळकर यांना फोन करून पेशंटवर उपचार करण्याबाबत सांगितले. त्यानुसार आरतीवर उपचार सुरु झाले. तब्बल पंधरा दिवसांच्या उपचारानंतर आरती ठणठणीत बरी झाली आहे. योग्य वेळी मदत केल्याबद्दल आरतीच्या नातेवाईकांनी डॉ.ओमप्रकाश शेटे यांचे आभार मानले.

### राष्ट्रीय युवा दिन्न युवा

युवा मेळावा, राष्ट्रीय एकात्मता उपक्रम माध्यमातून्न युवकांना प्रोत्साहन्न देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

१२ जानेवारी हा स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या जयंती निमित्ताने दिनांक १२ जानेवारी रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे जिल्ह्यातील जेष्ठ क्रीडा संघटक डॉ. अविनाश बारगजे, प्रा.डॉ. तान्नाजी आगळे, प्रा. गोपाळ धांडे, प्रा. दिनकर थोरात, जिल्हा क्रीडा अधिकारी

# डॉ. शैलेश हदगावकर मणक्याच्या शस्त्रक्रियेतील अग्रगण्य कार्यासाठी मराठवाडा गौरव २०२५ ने सन्मानित

अंबाजोगाई / छ संभाजीनगर । प्रतिनिधी

देशभरात नावाजलेल्या संचेती हॉस्पिटलचे स्पाईन अँड न्यूरोसर्जन विभागप्रमुख डॉ शैलेश हदगावकर हे मणक्याच्या शास्त्रक्रियेतील अग्रगण्य कार्यासाठी मराठवाडा गौरव २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. छत्रपती संभाजी नगर येथील हॉटेल हयात पॅलेस याठिकाणी डॉ हदगावकर हे महाराष्ट्र अर्थोपेडिक असोसिएशन , तसेच औरंगाबाद ऑर्थोपेडिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ फैसल खान व इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पुण्यातील प्रसिद्ध मणक्याचे शल्य चिकित्सक डॉ. शैलेश हदगांवकर हे मणक्याच्या उपचारांना अनुकूल बनवणे, मणक्याच्या प्रगत शस्त्रक्रियेमध्ये क्रांती घडवून आणणे, मणक्याच्या शस्त्रक्रियेच्या सरावात उत्कृष्टता आणि नाविन्यपूर्णतेचे मानक स्थापित करण्यात अग्रेसर आहेत.

पुण्यातील संचेती रुग्णालयातील स्पाइन अँड न्यूरोसायन्स युनिटचे प्रमुख म्हणून कार्यरत असतांना डॉ. शैलेश हदगांवकर यांनी या क्षेत्रातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानावर प्रकाश टाकणाऱ्या नेव्हिगेशन आधारित स्पाइन सर्जरी आणि एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरीमधील त्यांच्या अग्रगण्य सहभाग आहे. छ. संभाजी नगर येथील हॉटेल हयात प्लेस येथे ५ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या - स्पाइन कॉन्क्लेव्ह (महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन- औरंगाबाद ऑर्थोपेडिक असोसिएशन) दरम्यान हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ए. ओ. ए. चे अध्यक्ष डॉ. फैसल खान त्याचबरोबर डॉ हिमांशू कुलकर्णी हे या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. याशिवाय या पुरस्कार प्रदान सोहळ्यासाठी अंदाजे ५०० मान्यवरांची उपस्थिती होती. डॉ. हदगांवकर यांच्या समर्पक वृत्तीने, नाविन्यपूर्ण तंत्राने आणि त्यांच्यातील नेतृत्व गुणांनी जगभरातील अनेकांच्या जीवनात बदल घडवून आणला आहे असे पुणे येथील संचेती रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. पराग संचेती यांनी सांगितले. डॉ. शैलेश हदगांवकर यांनी युरोप (इंग्लंड), आफ्रिका (केनिया/टांझानिया) आणि भारतात सराव केला आहे आणि जगाच्या विविध भागात देखील त्यांनी मणक्यांच्या आजारांसाठी रुग्णांवर उपचार केले आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये ५० हून अधिक प्रकाशने प्रकाशित करून त्यांनी मणक्याच्या शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात व्यापक असे योगदान दीले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीसाठी ओळखले जाणारे डॉ. हदगांवकर हे पाठीच्या कण्याच्या विकृतीच्या क्षेत्रात ज्याला स्कोलियोसिस म्हणता येईल या क्षेत्रात त्यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी संचेती हॉस्पिटल, पुणे, महाराष्ट्र येथे फॅकल्टी म्हणून ( ए. ओ. स्पाइन) स्कोलियोसिस सप्ताह आयोजित केला आहे. २०१० साली इंग्लंडहून परतल्यानंतर मणक्याच्या संबंधी रुग्णांसाठी इंटरव्हेन्शनल पेन ब्लॉक्स आणि एकदिवसाच्या शस्त्रक्रिया सुरू करणाऱ्या मोजक्या सर्जन पैकी ते एक आहेत.त्यांच्या या अलौकिक कार्याद्वारे त्यांनी रुग्णांचे केवळ वैयक्तिक जीवनच सुधारले नाही तर वैद्यकीय शास्त्राच्या सीमा देखील ओलांडल्या आणि त्यामुळे या क्षेत्रात उल्लेखनीय बदल झाला.



ए. ओ. स्पाइन या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेशी त्यांचा सबंध हा संशोधन आणि इतरांना आपल्याकडील ज्ञान, कौशल्य देण्याप्रति त्यांची बांधिलकी अधोरेखित करतो. ते ए. ओ. स्पाइन (ए. ओ. एस. आय. एन.) चे सी. डी. कार्यालय आहे तेथे ते सामुदायिक विकासासाठी जबाबदार आहेत आणि फेलोशिप अधिकारी आहेत.

याव्यतिरिक्त, त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, ग्रीस आणि दक्षिण कोरियामध्ये प्रशिक्षण घेतले आहे. स्लिप डिस्क, सायटिका, स्पॉन्डिलोसिस, स्पायनल इंज्यूरी आणि स्कोलियोसिस यासारख्या वेदनादायक परिस्थितींसाठी पर्यायी उपचार आणि शस्त्रक्रियेतर उपचारांचा शोध घेण्यात ते कायम अग्रेसर असतात. त्यांच्या बहुतांश रुग्णांवर किफायतशीर उपचार करण्यावरही त्यांचा विश्वास आहे. डॉ. शैलेश हदगांवकर यांनी ग्लोबल एपीआय ई जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या आणि वारंवार उद्धृत केल्या जाणाऱ्या समांतर रॉड्सचा वापर करून टीएल स्पाइनच्या फ्रॅक्चर डिस्लोकेशनसह काही अभूतपूर्व तंत्रांचे नेतृत्व केले आहे. छत्रपती संभाजी नगर ऑर्थोपेडिक असोसिएशन, छ. संभाजी नगर चे अध्यक्ष डॉ. फैजल खान यांनी डॉ. हदगांवकर हे या पुरस्काराचे सर्वात योग्य प्राप्तकर्ता आहेत. त्यांनी या प्रदेशाचे आणि महाराष्ट्राचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात आणले आहे. या भागातील अशा शस्त्रक्रिया करणाऱ्या या क्षेत्रात नव्याने काम सुरु केलेल्या डॉक्टरांना डॉ. हदगांवकर यांच्याकडून प्रेरणा मिळते असेही डॉ फैसल खान या कार्यक्रमात म्हणाले. प्रख्यात मणक्याचे शल्य चिकित्सक डॉ. विवेक देशमुख या पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या निमित्ताने सांगतात की डॉ. शैलेश हे एक महान शिक्षणतज्ज्ञ आणि एक उत्तम माणूस आहेत, त्यांची रुग्णसेवेची मूल्ये अभूतपूर्व व वाखाणण्याजोगी आहेत. हा पुरस्कार डॉ. हदगांवकर यांनी पाठीच्या मणक्याच्या क्षेत्रात्? काम करणाऱ्या सर्व लोकांना येन केन प्रकारे मदत करण्यासाठी, त्यांचे या क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि पाठीच्या कण्याच्या देखभालीच्या प्रगतीसाठी केलेल्या अथक प्रयत्नांसाठी देण्यात आला असल्याचे सांगलीचे डॉ. हिमांशू कुलकर्णी यांनी सांगितले.

डॉ. शैलेश हदगांवकर यांनी ( औरंगाबाद ऑर्थोपेडिक असोसिएशन) सभासदांना मार्गदर्शन केले.ऑस्टियोपोरोटिक स्पॉन्डिलोलिस्थेसिससाठी त्यांच्याकडे लिमो डेल्टा म्हणून काही तंत्रे आहेत. तसेच, नेव्हिगेशनमध्ये नेव्हिगेशन आणि सर्व्हायकल आणि डोर्सोलंबर यूबीई एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी अंतर्गत स्पाइन स्टेंट (वर्टेब्रल बॉडी स्टेंटिंग) करणारे ते भारतातील पहिले आहेत. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक चर्चासत्रे, वेबिनार आयोजित केले आहेत. अनेक मोफत आरोग्य शिबिरे, जनजागृती कार्यक्रमांच्या आयोजनात देखील डॉ शैलेश यांचा सक्रिय भाग आहे. आगामी काळात पाठीच्या कण्याच्या दुखापतींवर अधिक संशोधन करायचे असल्याचे डॉ. शैलेश हदगांवकर म्हणाले.या कार्यक्रमास महाराष्ट्रातून पाचशेच्या वर डॉक्टर सहभागी झाले होते. मिळालेल्या पुरस्काराबद्दल डॉ शैलेश यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन व कौतुक होऊन त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# टोमॅटोच्या भावात एकाच महिन्यात मोठी घसरण

## उत्पादन खर्चही भरून निघत नसल्याने शेतकरी अडचणीत



पुणे : बाजारातील टोमॅटोची आवक वाढल्याने दरात मोठी घट झाली आहे. दीड ते दोन महिन्यापुर्वी बाजार समित्यांमध्ये ४ हजार ते ५ हजाराने विकलेला टोमॅटो आता ७०० ते १२०० रुपयाने विकावा लागत आहे. बाजारात एकाच महिन्यात झालेल्या पडझडीने शेतकरी मात्र चांगलेच अडचणीत आले आहेत.

देशभरातील बाजारात टोमॅटोची आवक वाढली आहे. आवक वाढल्यानंतर दरात घट झाली आहे. टोमॅटोचे भाव मागील दोन महिन्यांमध्येच जवळपास ५० टक्क्यांनी कमी झाले आहेत. बाजारात आवक वाढली पण उठाव मात्र स्थिर आहे. याचा दबाव टोमॅटोच्या भावावर दिसून आला. सध्या महत्वाच्या टोमॅटो उत्पादक राज्यांमध्ये नवा माल बाजारात येत आहे. उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि मध्य प्रदेशातील बाजारात टोमॅटोची आवक वाढली आहे. हा टोमॅटो देशभरातील बाजारात पाठवला जात आहे. त्यामुळे सर्व बाजारांमध्ये आवक जास्त दिसत आहे.

यंदा पाऊसमान चांगले होते. त्यातच लागवडीसाठी पोषक हवामान राहीले. त्यामुळे लागवडी चांगल्या झाल्या. तसेच पिकासाठी पोषक हवामान राहील्याने उत्पादनही चांगले राहीले. हा माल आता बाजारात येत आहे. राज्याच्याही इतर भागात टोमॅटोची आवक सुरु वाढली आहे. नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्या आणि नारायणगाव बाजार समितीमध्ये आवक वाढलेली आहे. त्यामुळे टोमॅटोला मिळणारा बाजारभाव खूपच कमी झाला. बाजारातील टोमॅटोची आवक नोव्हेंबर महिन्याच्या शेवटपासूनच वाढायला सुरुवात झाली होती. त्यानंतर बाजार हळूहळू कमी होत गेला. नोव्हेंबर महिन्यात टोमॅटोचा भाव प्रतिक्विंटल ४ हजार ते ५ हजार रुपयांच्या दरम्यान होता. डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीलला या दरम्यानच भाव होते. पण बाजारात जशी आवक वाढत गेली तसे दरातही घट होत गेली. किरकोळ बाजारात टोमॅटो ७० ते ८० रुपयाने विकला जात होता. तो आता २० ते ३० रुपये किलोने विकला जात आहे.

भाव उत्पादन खर्चापेक्षाही खाली

बाजारातील आवक वाढल्याने एकाच महिन्यात भावात निम्म्याने घट झाली. लागवडी एकाच वेळी तोडणीला आल्याने बाजारात पुरवठा वाढला. आज अनेक बाजारात टोमॅटोचा सरासरी भाव ५०० रुपये प्रतिक्विंटलच्या दरम्यान दिसून येत आहे. तर सरासरी भावपातळी ७०० ते १२०० रुपयांच्या दरम्यान दिसून येत आहे. टोमॅटोचा उत्पादन खर्चही भरून निघत नसल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले.

# पाच जिल्ह्यांत कारखान्यांची गाळप गती कमी

छत्रपती संभाजीनगर

यंदाच्या ऊस गाळप हंगामात जालना बीड व छत्रपती संभाजीनगर तसेच जळगाव व नंदुरबार जिल्ह्यांतील कारखान्यांची सरासरी दैनिक गाळप क्षमता ९३ हजार ६५ टन आहे. त्या तुलनेत कारखाने सरासरी ७७,८०९ प्रतिदिन क्षमतेने उसाचे गाळप करत आहेत. म्हणजे गाळप क्षमतेच्या तुलनेत कारखाने कमी गतीनेच ऊस गाळप करीत असल्याची स्थिती आहे.

यंदाच्या उस गाळप हंगामात मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ६, जालन्यातील चार, बीडमधील सात, जळगावमधील एक व नंदुरबारमधील दोन मिळून २० कारखान्यांनी सहभाग घेतला आहे. यामध्ये १२ सहकारी तर ८ खासगी साखर कारखान्यांचा समावेश आहे. १२ सहकारी साखर कारखान्यांची दैनिक गाळप क्षमता सरासरी ४४,१५० टन असताना १२ जानेवारीला प्रत्यक्षात कारखाने सरासरी ४१,९२५ टन क्षमतेने ऊस गाळप करत होते. दुसरीकडे आठ खासगी कारखान्यांची दैनिक गाळप क्षमता सरासरी ४९,५०० टन असताना प्रत्यक्षात हे कारखाने ३५,८८४ टन क्षमतेने ऊस गाळप करीत होते. पाचही जिल्ह्यांपैकी केवळ जालना जिल्ह्यातील चार कारखान्यांची सरासरी गाळप क्षमता १७ हजार टन प्रतिदिन असताना ते प्रत्यक्षात २२ हजार ३६ टन क्षमतेने ऊस गाळप करत होते.

४१ लाख ४१ हजार टन उसाचे गाळप

मराठवाडा व खानदेशातील पाच जिल्ह्यांतील २० कारखान्यांनी मिळून १२ जानेवारी अखेरपर्यंत ४१ लाख ४१ हजार ९७६ टन उसाचे गाळप केले. या गाळपातून सरासरी ७.३३ टक्के साखर उताऱ्याने ३० लाख ३५ हजार ४७५ क्विंटल साखरेचे उत्पादन केले.

जिल्हानिहाय ऊस गाळप, साखर उत्पादन

नंदुरबार : जिल्ह्यातील एक सहकारी व एक खासगी मिळून दोन कारखान्यांनी ४ लाख १९ हजार १२० टन उसाचे गाळप करत सरासरी ५.७७ टक्के साखर उताऱ्याने २ लाख ७६ हजार ४३५ क्विंटल साखरेचे उत्पादन केले.

जळगाव : जिल्ह्यातील एका खासगी कारखान्याने ७०,७५२ टन उसाचे गाळप करत सरासरी ९.१७ टक्के साखर उताऱ्याने ६४,८७५ क्विंटल साखर उत्पादन केले.

छत्रपती संभाजीनगर : जिल्ह्यातील तीन सहकारी व तीन खासगी मिळून सहा कारखान्यांनी ८ लाख ६७ हजार ७५९ टन उसाचे गाळप करत सरासरी ९.३१ टक्के साखर उताऱ्याने ८ लाख ७ हजार ७६० क्विंटल साखरेचे उत्पादन केले.

जालना : जिल्ह्यातील २ सहकारी व २ खासगी मिळून चार कारखान्यांनी ९ लाख ८७ हजार ३२० टन उसाचे गाळप करत सरासरी ७.८५ टक्के साखर उताऱ्याने ७ लाख ७५ हजार ४० क्विंटल साखरेचे उत्पादन केले.

बीड : जिल्ह्यातील ५ सहकारी व २ खासगी मिळून ७ कारखान्यांनी १७ लाख ३६ हजार ९९५ टन उसाचे गाळप करत सरासरी ६.४ टक्के साखर उताऱ्याने ११ लाख ११ हजार ३६५ क्विंटल साखरेचे उत्पादन केले.

# कार्नेशन फुलाची शेती करून एकरी कमवा लाखो रूपये



शेतकरी सध्या फळांची आणि फुलांची मोठ्या प्रमाणात लागवड करताना दिसत आहेत. यामध्ये फुलांच्या लागवडीमधून चांगला नफा देखील मिळतो. त्यामुळे अनेकजण याची लागवड करण्यास प्राधान्य देतात. यामध्ये कार्नेशन फुलापासून शेतकरी भरपूर कमाई करतात. कार्नेशन हे जगातील सर्वात लोकप्रिय फुलांपैकी एक आहे. ज्याची लागवड बिहारसह भारतातील विविध राज्यांमध्ये केली जाते.लागवड कधी करतात :१ एप्रिल ते १५ एप्रिल या दरम्यान लागवड केल्यास उत्तम. एप्रिल महिन्यात लागवड केल्यास रोपांना कीड लागण्याची शक्यता कमी राहते. लागवड करताना दोन बेड मधील अंतर ६ फूट ठेवावे.कार्नेशन लागवडीसाठी चांगली निचरा होणारी माती, सूर्यप्रकाश आणि योग्य काळजी आवश्यक आहे. कार्नेशन १५ ते २५ अंश सेल्सिअस तापमानात वाढतात. त्यांची रोपे ६.० आणि ७.० च्या दरम्यान पीएच पातळी असलेल्या जमिनीत सर्वोत्तम लागवड करतात. याची लागवड जरी बिहारमध्ये होत असली तरी शेतकरी बांधवानो तुम्ही याची लागवड महाराष्ट्रामध्ये देखील करू शकता. याबाबत योग्य ती माहिती घेऊन तुम्ही या फुलाची शेती करू शकता.

एकूण खर्च किती :एक एकरात १० हजार रोपे लागतात. एक रोप सोदाहरण ३ ते ५ रुपये किमतीला बसते. म्हणजे एकरी रोपांचा खर्च ४० हजार लागतो. तसेच ड्रीप यासाठी महत्वाचे असते. ड्रीपला २५ हजार अन खतासाठी ३० हजार खर्च येतो. असा जवळपास एकरी खर्च १ लाख ते २ लाख होऊ शकतो.

वाणांची निवड :कार्नेशनचे विविध प्रकार उपलब्ध आहेत. मानक कार्नेशन, स्प्रे कार्नेशन आणि लघु कार्नेशन्ससह. स्थानिक हवामान आणि बाजारपेठेतील मागणी लक्षात घेऊन योग्य वाणांची निवड केली जाते. चांगल्या उत्पादनासाठी, त्यांच्या झाडांमधील अंतर सुमारे २५ ते ३० सें.मी. असते. वर्षाला लाखोंचे उत्पन्न :एका महिन्यात ५ ६ वेळा फुल तोडणी होते. एका तोडीला साधारण २० हजार रुपये तरी येतात. यानुसार वर्षाला ६ लाख रूपयांचे उत्पन्न मिळू शकते.फुले कात्री आणि चाकूने कापली जातात :जेव्हा कळ्या अर्धवट उघडल्या जातात तेव्हा कार्नेशन फुलांची कापणी केली जाते. झाडे आणि फुलांचे नुकसान टाळण्यासाठी धारदार कात्री किंवा चाकूने कापणी काळजीपूर्वक केली जाते. त्याचबरोबर इतर फुलांपेक्षा कार्नेशनला शेतात तयार होण्यासाठी जास्त वेळ लागतो. लागवडीनंतर सुमारे ७० ते ८० दिवसांत कार्नेशन तयार होतात. एक एकर शेतात कार्नेशन फ्लॉवरची लागवड करण्यासाठी सुमारे दहा हजार रुपये खर्च येतो, असं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे. त्याचबरोबर १०० क्विंटलपेक्षा जास्त उत्पादन मिळते. याशिवाय एका कार्नेशनच्या फुलाची घाऊक किंमत सुमारे चार रुपये बाजारात उपलब्ध आहे. त्यामुळे यामधून शेतकरी चांगला पैसे कमावू शकता.

# पीक अवशेषापासून बायोडायनॅमिक कंपोस्ट



एक हंगाम संपून दुसरा हंगाम सुरू होताना शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पिकांचे अवशेष उपलब्ध असतात. ते व्यवस्थित कुजवून त्यापासून सेंद्रिय खत तयार करणे शक्य आहे. त्यासाठी सोप्या आणि कमी वेळेत सेंद्रिय खत उपलब्ध करणाऱ्या बायोडायनॅमिक कंपोस्टिंग याची माहिती असण्याची गरज आहे.

सेंद्रिय खतांच्या अभावामुळे जमिनीची सुपीकताच धोक्यात येत आहे. कारण सेंद्रिय पदार्थ हेच जमिनीमधील उपयुक्त जिवाणूंचे मुख्य अन्न आहे. जिवाणूच्या अभावामुळे रासायनिक खतांच्या दिलेल्या मात्रांनाही प्रतिसाद मिळत नाही. जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण हे जमिनीची सुपीकता दर्शवते. ते किमान १ टक्क्यापेक्षा अधिक असले पाहिजे. बहुतांश शेतातील माती तपासणी अहवालामध्ये हे प्रमाण ०.२० पेक्षा कमी आढळते. हे प्रमाण जर वाढविण्यासाठी आपल्या शेतातच उपलब्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या सेंद्रिय पदार्थांचे कंपोस्ट करावे लागणार आहे. शेतकऱ्यांकडे सोयाबीन कुटार/काड, कापूस वेचणीनंतर पऱ्हाट्या, उडीद मुगाचे कुटार, उसाचे पाचट, भाजीपाला इ. पिकांचे काढणी पश्चात अवशेष आणि शेतातील तण हे सेंद्रिय घटक दर काही काळानंतर उपलब्ध होत असतात. त्यांचे कंपोस्टिंग व पुनर्चक्रीकरण करण्यासाठी १९२४ मध्ये ऑस्ट्रियन विचारवंत रूडॉल्फ स्टेनर यांनी मांडलेली बायोडायनॅमिक कंपोस्टिंग पद्धत उपयुक्त ठरते. मात्र ही पद्धत आपल्या भारतीय शेतकऱ्यांना वापरण्याइतकी सोपी करण्यासोबतच तिचा प्रचार, प्रसार करण्याचे काम सर्ग विकास समिती सातत्याने करत आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे ‘बायोडायनॅमिक कंपोस्टिंग’ ही पद्धत अल्प खर्चात व कमी काळात शेतकऱ्यांना सेंद्रिय खत उपलब्ध करते.

बायोडायनॅमिक कंपोस्ट करण्याची पद्धत :मुख्य पीक काढणीनंतर पीक अवशेष न जाळता शेतात झाडांच्या सावलीला जमा करावे. कापणीनंतर पीक अवशेष ओलसर असताना पूर्ण सुकले असतील तर ते ३ ते ४ दिवस हलके हलके पाणी मारत भिजवून घ्यावे.शेतातच उंचवट्याच्या ठिकाणी १५ फूट लांब व ५ फूट रुंद जागा आखून घ्यावी. या जागेत ओलसर पीक अवशेषांचा १ फुटाचा थर रचावा. त्यावर गाईच्या शेणापासून तयार करण्यात येणारे कंपोस्ट कल्चर (बायोडायनॅमिक सी.पी.पी.) १ किलो या प्रमाणात पाण्यात मिसळून ते पाणी शिंपडावे. हे द्रावण तयार करण्यासाठी एका बादलीमध्ये १३ लिटर पाणी घेऊन, त्यात १ किलो कल्चर मिसळावे. ते चांगल्या पद्धतीने मिसळले जाण्यासाठी सुमारे १ तास सरळ-उलट भोवरा पडेल इतक्या वेगाने फिरवावे. हे द्रावण १०० लिटर पाण्यात मिसळून ते वाढवून घ्यावे. हे द्रावण आपल्याला प्रत्येक थरावर शेणकाल्यात मिसळून १० ते १५ लिटर या प्रमाणात शिंपडायचे आहे. पुढे पहिल्या थरावर एक फुटाचा ताज्या हिरव्या पाल्याचा थर रचावा. त्यावर आपल्याच शेतातील ६ ते ७ घमेले माती पसरवून घ्यावी. त्यावर सी.पी.पी. युक्त शेणकाला १० ते १५ लिटर शिंपडावा. हिरव्या पाल्यामुळे पीक अवशेषांचे कर्ब व नत्र गुणोत्तर सुधारून कुजण्याची प्रक्रिया सोपी होते.अशा प्रकारे ४ ते ५ फूट उंचीपर्यंत एकावर एक थर रचून घ्यावेत. तयार झालेला संपूर्ण ढीग सर्व बाजूंनी शेण काल्याने लिंपून घ्यावा. पुढे या लिंपलेल्या ढिगास तडे पडू शकतात. ते शेण काल्याने वेळोवेळी बंद करावे.

एक महिन्यानंतर ५० टक्क्यांपर्यंत पीक अवशेष व हिरवे पाले कुजतात. या प्रक्रियेत ढिगाचा आकारसुद्धा कमी होतो. त्यानंतर ढिगाची उकरी करून सरमिसळ करून घ्यावी. त्यावर पुरेसे पाणी टाकून ढीग पुन्हा आकारून लिंपून घ्यावा. या वेळी पुन्हा कंपोस्टिंग कल्चर सी.पी.पी. वापरण्याची आवश्यकता नाही. पुढील ४० ते ४५ दिवसांत सर्व पदार्थ कुजून दर्जेदार कंपोस्ट मिळेल. एक एकरामधील पीक अवशेषांचे या प्रकारे दीड ते दोन ढीग (डेपो) लागतील.

असा होतो फायदा :कृषी विद्यापीठांमध्ये करण्यात आलेल्या विश्लेषणानुसार, या बायोडायनॅमिक पद्धतीने तयार केलेल्या कंपोस्टमध्ये ४० टक्के सेंद्रिय कर्ब, नत्र २.२७ टक्के, सल्फर १ टक्का, पालाश १ टक्का व मॅंगेनीज सारखी सूक्ष्म अन्नद्रव्ये मिळतात. यामुळे एक एकरातील पीक अवशेषांचे कंपोस्ट वापरल्यास पिकासाठी लागणारी काही अन्नद्रव्य मात्रा यातून मिळते. मात्र सेंद्रिय खतांची पूर्ण गरज यातून भागू शकते. या पद्धतीने पदार्थ संपूर्ण कुजल्यामुळे तणांचे बी आणि किडींचे कोष याचाही बंदोबस्त होतो.




### महत्वाच्या घटना

१६५९ : पहिला धनादेश ब्रिटीश बँकेतून काढण्यात आला, तो नँशनल वेस्टमिन्स्टर बँकेत जपून ठेवण्यात आला आहे.

१७०४ : औरंगजेबाने राजगड जिंकून त्याचे नाव नबीशाहगड असे ठेवले.

१९१८ : लिथुएनियाने (रशिया व जर्मनीपासून) स्वातंत्र्य जाहीर केले.

१९५९ : फिडेल कॅस्ट्रो क्यूबाच्या अध्यक्षपदी

१९६० : अमेरिकी अणुपाणबुडी ट्रायटन ने पाण्याखालून पृथ्वी प्रदक्षिणा करण्यास प्रस्थान केले.

१९६९ : मिर्झा गालिब यांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्ताने डाक तिकीट जारी केल्या गेले.

१९८५ : लेबनॉनमध्ये हिजबोल्ला या कट्टरपंथीय शिया मुस्लिम संघटनेची स्थापना.

१९८२ : कोलकत्ता येथे जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय गोल्ड कप फुटबॉल स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.

२००८ : प्रसिद्ध गायक नितीन मुकेश यांना मध्य प्रदेश सरकार फ कडून लता मंगेशकर पुरस्कार देण्यात आला.

२००८ : बिहार च्या नितीश कुमार यांनी मुख्यमंत्री कन्या विवाह योजनेचे उद्घाटन करण्यात आले आहेत.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२२२ : जपानमधील निचिरेन बौद्ध पंथाचे स्थापक निचिरेन यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑक्टोबर १२८२)

१७४५ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव पेशवे मराठा साम्राज्यातील ४ था पेशवा, १६ व्या वर्षी पेशवेपदावर विराजमान झालेला अत्यंत कर्तबगार पेशवा. पानिपतच्या युध्दानंतर विस्कटलेली मराठेशाहीची घडी त्यांनी बसविली. (मृत्यू: १८ नोव्हेंबर १७७२)

१८२२ : बोटांचे ठसे, रंगांधळेपणा आणि स्त्रियांच्या सौंदर्यावर संशोधन करणाऱ्या सर फ्रान्सिस गाल्टन यांचा जन्म.

१८७६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (मृत्यू: ६ मे १९६६)

१९०९ : मॅकडोनाल्ड चे सहसंस्थास्थापक रिचर्ड मॅकडोनाल्ड यांचा जन्म. (मृत्यू: १४ जुलै १९९८)

१९२० : प्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेता आई.एस. जोहर यांचा जन्म.

१९३७ : प्रसिद्ध चित्रकार गुलाम मोहम्मद शेख़ यांचा जन्म.

१९४१ : उत्तर कोरिया चे माजी प्रशासक किंम जोंग इल यांचा जन्म.

१९४८ : भारतीय चित्रपट कलाकार हैदर अली यांचा जन्म.

१९५४ : मायकेल होल्डिंग वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू

१९६१ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध गायक शेखर सेन यांचा जन्म.

१९६४ : बेबेटो ब्राझीलचा फुटबॉलपटू

१९७७ : प्रसिद्ध दक्षिणात्य चित्रपट अभिनेता दर्शन थुगुडीपा यांचा जन्म.

१९७८ : वासिम जाफर भारतीय क्रिकेटपटू

१९९७ : प्रसिद्ध कब्बडी प्लेयर परदीप नरवाल चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४४ : धुंडिराज गोविंद ऊर्फ 'दादासाहेब' फाळके भारतीय चित्रपट उद्योगाचे जनक, लेखक, छायाचित्रकार, दिग्दर्शक, संकलक, वेशभूषाकार, कलादिग्दर्शक इ. अनेक जबाबदार्या ते सांभाळत असत. (जन्म: ३० एप्रिल १८७० त्र्यंबकेश्वर, नाशिक, महाराष्ट्र)

१९५६ : मेघनाद साहा खगोलभौतिकशास्त्रज्ञ व संसदसदस्य. तार्यांच्या वातावरणाचे तापमान आणि आयनीभवन यांचा संबंध स्पष्ट करणारा सिद्धांत त्यांनी मांडला. भारताचे स्वत:चे राष्ट्रीय पंचांग त्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले. (जन्म: ६ आक्टोबर १८९३)

१९६८ : नारायणराव सोपानराव बोरावके कृषी शिरोमणी, पहिले मराठी साखर कारखानदार, पुणे, सोलापूर व नगर जिल्ह्यांत अनेक संस्था व उद्योग त्यांनी उभे केले. संशोधित फळांच्या उत्पादनास त्यांनी प्रोत्साहन दिले. १९३३ मध्ये त्यांना 'रावसाहेब' तर १९४६ मध्ये त्यांना ‘रावबहादूर‘ हे किताब मिळाले. शेतीच्या आधुनिकीकरणावर त्यांनी भर दिला. (जन्म: १७ आक्टोबर १८९२)

१९९४ : पं. निवृत्तीबुवा सरनाईक जयपूर-अत्रौली घराण्याचे गायक (जन्म: ४ जुलै १९१२)

१९९६ : आर. डी. आगा उद्योगपती, थरमॅक्स उद्योगसमुहाचे संस्थापक (जन्म:)

२००० : बेल्लारी शामण्णा केशवन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ग्रंथालयशास्त्रज्ञ, पद्मश्री, 'इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेंटेशन सेंटर'चे पहिले संचालक

२००१ : रंजन साळवी ‘पिंजरा', ‘सवाल माझा ऐका', ‘केला इशारा जाता जाता' आदी मराठी चित्रपटांचे नृत्यदिग्दर्शक (जन्म:)

# लाडकी बहीण योजनेबाबत फडणवीस सरकारची कोर्टात महत्त्वाची माहिती; जनहित याचिकेवर सुनावणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना हा राज्य शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमूळे राज्य शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. असे म्हणत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात राज्य सरकारने प्रतिज्ञापत्रातून आपली बाजू मांडली आहे.**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला घेऊन सध्या नागपूर खंडपीठात एक जनहित याचिकेची सुनावणी सुरु आहे. यावर बोलताना राज्य सरकारने आपली भूमिका मांडत मत स्पष्ट केले आहे.

**पुढील सुनावणी ७ फेब्रुवारीला**

लाडकी बहीण आणि वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांवर आक्षेप घेणाऱ्या याचिकेवर राज्य सरकारला उत्तर सादर करण्यासाठी नागपूर खंडपीठाने १५ जानेवारीपर्यंत वेळ वाढवून दिला होता. दरम्यान, नागपूर खंडपीठाने हा वेळ राज्य सरकारने केलेल्या विनंतीवरून वाढवून दिला होता. त्यामुळे लाडकी बहीण योजनेवर आक्षेप घेणाऱ्या याचिकेवर राज्य सरकारला तूर्तास दिलासा मिळाला होता. अशातच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी संबंधित विभागाच्या हेड अर्थसंकल्पीय निधीची तरतूद करण्यात आली असल्याचे शासनाने आपल्या प्रतिज्ञापत्रात आज म्हटले आहे. तर या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ फेब्रुवारीला होणार आहे.




विधानसभा निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण योजनेसह विविध योजनांवर आक्षेप घेत काँग्रेस नेते अनिल वडपल्लीवार यांनी जनहित याचिका दाखल केली होती. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोफत लाभ देणाऱ्या योजना राज्याचा आर्थिक आरोग्य खराब करण्यास कारणीभूत ठरू शकतात, असे या याचिकेत म्हंटले होते. दरम्यान, यावर खंडपीठाने सुरुवातीला २३ ऑक्टोबरपर्यंत उत्तर सादर करण्यास सांगितले होते. त्यानंतर ३ डिसेंबरपर्यंत उत्तर सादर करण्याच्या सूचना नागपूर खंडपीठाने दिल्या होत्या. यावर राज्य सरकारने पुन्हा वेळ वाढवून मागितल्याने १५ जानेवारीपर्यंत उत्तर सादर करण्याची वेळ नागपूर खंडपीठाने वाढवून दिली होती. तर या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ७ फेब्रुवारीला होणार आहे.

**नाव काढून घेण्यासंदर्भातील प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह?**

महाराष्ट्र सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून सुरु केली होती. राज्याचा पुरवणी अर्थसंकल्प मांडताना ही घोषणा करण्यात आली होती. प्रत्यक्ष लाडक्या बहिणींना ऑगस्ट महिन्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे पैसे मिळाले होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये नोंदणीची मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत देण्यात आली होती. निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मोठ्या प्रमाणावर अर्ज भरुन घेण्यात आले होते. आता राज्याचे माजी मंत्री छगन भुजबळ यांनी ज्या महिला लाभार्थी पात्र नाहीत त्यांनी योजनेतून स्वत:हून नाव काढूनं टाकावं असं म्हटलंय. मात्र, लाडकी बहीण योजनेतून बाहेर पडण्याची नेमकी प्रक्रिया काय याबाबतचं चित्र स्पष्ट नाही. त्यामुळं संभ्रमाचं वातावरण आहे.

दरम्यान, डिसेंबर महिन्यात राज्य सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या २ कोटी ५२ लाख महिलांना १५०० रुपये देण्यात आले होते.

## मोठेवाडी येथे उरूस यात्रा उत्सवाला सुरुवात



माजलगाव

तालुक्यातील मोठेवाडी येथील हिंदु- मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असलेल्या औरंगशाह बाबा (पीर) यांच्या ऊरूस यात्रा उत्सवाला दिनांक १५ जानेवारी बुधवार पासून उत्साहात प्रारंभ झाला असून या निमित्ताने विविध कार्यक्रम सुरू आहेत.

परिसरातील मोठीवाडी या गावात विविध धार्मिक उपक्रम नेहमी सुरू असतात, यात गावातील सर्व जातीधर्माचे लोक या उत्सवांमध्ये सहभागी होत असतात, यात ऊरूस यात्रा सर्वांसाठी गावाची जत्रा म्हणून परिसरात प्रसिद्ध आहे, या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांबरोबर पाळणे, मिठाई, खेळणी विक्रेते व विविध दुकानांची रेलचेल सुरू झाली असून यामध्ये दि.१६ जानेवारी गुरूवार रोजी भक्तगण औरंगशाह बाबा(पीर) यांची केलेली नवसपुर्ती पुर्ण करण्यासाठी बारा गाड्या ओढुन आपली नवसपुर्ती पूर्ण करणार आहेत.या वर्षी ४७ भक्तगणांनी यामध्ये सहभाग नोंदवत रविवार पासून रोजा उपवास करत दरगाह समोर गाड्या ओढण्यासाठी बसले आहेत.पाच दिवस रोजा उपवास करून बारा गाड्या ओढल्या नंतर सायं ७:०० वाजता औरंगशाह बाबा पीर यांची गावातुन संदल मिरवणूक काढण्यात येणार आहे.तर दि.१७ जानेवारी शुक्रवार रोजी जंगी कुस्त्यांचा सामना होणार असुन परिसरातील मल्लांनी यामध्ये सहभाग घेऊन कुस्ती फडाची रंगत वाढवावी असे आवाहन समस्त मोठेवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जीभेवरचा गोडवा विकल्प विरहित असायला हवा-राम कुलकर्णी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माणुस म्हणुन जगताना नकारात्मक गोष्टीला प्राधान्य देण्यापेक्षा सुसंवाद आणि सकारात्मक वृत्ती खर्या अर्थाने आनंदी जगण्याचा मार्ग असु शकतो. मकर संक्रमणाच्या काळात जीभेवरचा गोडवा जसा वाढतो तो आयुष्यात सतत ठेवला आणि विकल्प विरहित जीवन जगले तर खर्या अर्थाने तणावमुक्त माणुस राहु शकतो. शुद्ध कर्म हाच खरा उन्नतीचा मार्ग असुन कुणाचाही द्वेष आणि निंदा करण्यापेक्षा सुसंवादातुन वाढवलेली गोडी संसारिक जीवनासाठी उत्कर्ष ठरते असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार राम कुलकर्णी यांनी केले. खोलेश्वर महाविद्यालयात आयोजित तीळ गुळाच्या कार्यक्रमात बोलत होते.

व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.फुलारी, डॉ.बिभीषण फड, आनंद पाठक,प्रा.गौतम गायकवाड, प्रा.सतिश हिवरेकर यांची उपस्थिती होती. महा.विकास समिती अध्यक्ष तथा पत्रकार राम कुलकर्णी यांनी मकर संक्रांतीच्या औचित्याने दिशादर्शक मार्गदर्शन केले. भारतीय हिंदु संस्कृतीत असे उत्सव पारंपारिक साजरे केले जातात. ज्याला अध्यात्मिक शक्तीचा फार मोठा आधार असल्याचे ते म्हणाले. पण जीवन जगताना माणसाने कसं जगावं?हे सांगताना संसार जीवनात आनंद हवा असेल तर नेहमीच स्वत:च्या जीभेवर असलेला गोडवा परस्परांमध्ये केला जाणारा सुसंवाद तीळा तीळाने आनंद देणारा ठरतो. स्वत:च्या अंगी चांगले सद्गुण असतील आणि माणुस म्हणुन जेव्हा आपण जीवन जगतो त्यावेळी परस्परांमध्ये आनंदाचे तीळगुळ नेहमीच वाटप केले तर मग आपलं शरीर आणि मन विकल्पमुक्त होतं आणि त्यावेळी मिळणारा आनंद हा खर्या अर्थाने कुठलाही संकल्प पुर्ण होण्यासाठी योग्य दिशेने जातो. मनाचे संक्रमण शुद्ध कर्माने जीवन जगण्यात झाले तर आपल्या हातुन कुठलीही चुक होवु शकत नाही. समाजामध्ये वावरताना दुसर्याचा विचार करा. गोरगरिबांना मदत करा.



एवढेच नव्हे तर आपल्या कृतीतून कुणाच्या डोळ्यांत आश्रु येणार नाहीत ही काळजी घेतली तर स्वभावातला गोडवा अनियमित मकर संक्रांत साजरी केल्यासारखाच असतो. कुणाविषयीही दुराग्रह न ठेवता किंवा कुणाच्या पाठीमागे निंदा नालस्ती न करता जेव्हा आपण पारदर्शक आणि मनाचा मोठेपणा ठेवत जगण्याचा आनंद घेतो तो खरा गोडवा आत्मिक मन:शांती दिल्याशिवाय रहात नाही. कुठल्याही संस्थेत काम करत असताना प्रत्येकाला वेगवेगळे दायित्व असते आणि ते जर दायित्व कर्तव्य आणि जबाबदारी ओळखुन पार पाडले तर तिथे आपोआप गोडवा निर्माण होतो आणि मग समाज हितासोबतच आपल्या स्वभावाचे सद्गुण सुगंधासारखे समाजात पसरतात अशा वेळी नकारात्मकता निघुन जाते. जर जीवनात गोडी हवी असेल तर त्यासाठी सकारात्मकता आणि परस्परांमधला सुसंवाद यातुनच खर्या अर्थाने आनंद मिळतो. चला तर मग, अशा पर्वकाळाच्या दिवशी संकल्पाने जीवन जगण्याचा प्रयत्न करूया या शब्दांत त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे आभार शिक्षकेत्तर कर्मचारी श्री गुजर यांनी मानले. यावेळी उपस्थितांना मान्यवरांच्या हस्ते तीळ गुळाचे वाटप करून उत्सव साजरा करण्यात आला.

## मराठी पत्रकार परिषदेच्या तीन शिलेदारांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार!



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मराठी पत्रकार परिषदेचे शिलेदार पत्रकार सचिन पवार, पत्रकार संजय सानप, पत्रकार अनिल गायकवाड उत्कृष्ट लेखणीबद्दल दर्पण दिनानिमित्त विविध संस्थेकडून पुरस्कार मिळाले आहेत. मराठी पत्रकार परिषद पाटोदा तालुक्याच्या वतीने या तीनही शिल्यादारांचा पाटोदा येथील शासकीय विश्रामगृह येथे सत्कार करण्यात आला.

अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रामध्ये काम करत असलेले पत्रकार सचिन पवार यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था नाशिक त्यांच्याकडून दिला जाणारा राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार मिळाला तसेच पत्रकार संजय सानप यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई यांच्याकडून दिला जाणारा दर्पण पुरस्कार मिळाला. तसेच पत्रकार अनिल गायकवाड यांना ठाणे येथील साहित्यिक साहित्य वारी या दैनिकाचा पुरस्कार मिळाला आहे. या मराठी पत्रकार परिषदेच्या पत्रकारांनी अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केला आहे. अनेक पुरस्कारही प्राप्त झाले आहे. यावर्षी या तिघांनाही पुरस्कार मिळाल्याने मराठी पत्रकार परिषदेकडून तिघांचाही सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यांचा ज्येष्ठ पत्रकार छगनराव मुळे, इद्रिस चाऊस, कादर मकरानी, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सत्कार संपन्न झाला, यावेळी पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजू भैया जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष अजय जोशी, काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना तालुका अध्यक्ष मुकुंद शिंदे,अक्षय कांकरिया, ज्येष्ठ पत्रकार दयानंद सोनवणे, हमीद पठाण, अशोक भवर, जावेद शेख, हरिदास शेलार, नानासाहेब डिडुळ, दत्ता देशमाने, सतीश गर्जे, फयाज शेख, दिगंबर नाईकनवरे, सचिन शिंदे यांच्यासह अनेक पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून लेखणीची व सामाजिक चळवळ सुरू ठेवणारे पत्रकार सचिन पवार, संजय सानप, अनिल गायकवाड यांना तीन वेगवेगळ्या संस्थांकडून पुरस्कार प्राप्त झाले आहे त्याबद्दल मराठी पत्रकार परिषदेकडून त्यांचा आज जाहीर सत्कार करण्यात आला तसेच पाटोदा तालुक्यातील विविध पक्ष संघटनेच्या पदाधिकाऱ्याकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव देखील करण्यात आला. दर्पण दिन ६ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात राज्यभरामध्ये साजरा केला जातो या दिवशी सर्व पत्रकारांना सन्मानित केल्या जातं आणि शुभेच्छा ही दिल्या जातात त्यातच औचित्य साधून मराठी पत्रकार परिषदेकडून यावर्षी सर्व पत्रकारांना सन्मानचिन्ह आणि ओळखपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तो कार्यक्रमही आज घेण्यात आला. सेलू येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे देखील केलं नियोजन सेलू जिल्हा परभणी येथे एक फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि तालुका अध्यक्षांचा मेळावा हा मोठ्या उत्साहात होणार आहे त्याच अनुषंगाने पुणे ते सेलू पत्रकार एकता रॅली पाटोदा नगरीत येणार आहे त्या अनुषंगाने देखील आज कार्यक्रम संपल्यानंतर नियोजन करण्यात आले पत्रिका आल्यानंतर सविस्तर आढावा घेऊन पत्रकार एकता रॅलीच जंगी स्वागत पाटोदा शहरांमध्ये केलं जाणार असल्याची माहिती देखील मिळाली आहे.

## आज बेरोजगारांचा महामेळावा

म्हसोबावाडी/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत बेरोजगार युवकांना प्रशिक्षणार्थी संधी उपलब्ध करून दिली होती, विविध शासकीय विभागात हे सर्व युवक कार्यरत असून, आपले कर्तव्य आणि जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्तम प्रकारे पार पाडत आहेत, दरम्यान सर्व युवकांना शासकीय कामाचा अनुभव आणि मार्गदर्शन उत्तम प्रकारे मिळत असल्याचे युवकांचे म्हणणे आहे परंतु या प्रशिक्षणार्थचा कालावधी हा सहा महिन्याचा असल्याकारणाने येत्या फेब्रुवारी २०२५, मध्ये हा कालावधी पूर्ण होणार आहे, त्यानंतर हे सर्व युवक बेरोजगार होणार असल्याची भीती या युवकांमध्ये आहे.

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री तसेच मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जाहीर केल्याप्रमाणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी ज्या अस्थापानेत कार्यरत आहेत तिथेच त्यांना नियमित करण्यात येईल,असे आश्वासन दिले होते, याचीच आठवण करून देण्यासाठी आणि इतर मागण्यांकडे देवेंद्र फडणवीस सरकारचे लक्ष वेधण्याकरिता माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली१६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.००वाजता आझाद मैदान, मुंबई येथे महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे,या मोर्चामध्ये महाराष्ट्रभरातून हजारो युवक सहभागी होणार आहेत. आष्टी तालुक्यातील प्रशिक्षणार्थींनी उपस्थित रहावे, असे आवाहन ज्ञानराज घोडके यांनी केले आहे.

## विद्यापीठ नामविस्ताराचा लढा हा समाज परिवर्तनाचाच लढा -प्रा. डॉ.चाटे

अंबाजोगाई /प्रतिनिधी

मराठवाडा विद्यापीठ नामविस्ताराचा लढा हा समाज परिवर्तनाचाच लढा होता असे प्रतिपादन प्रा. राजकुमार चाटे यांनी केले.येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या एक तिसाव्या नामविस्तार दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी प्रा. राजकुमार चाटे यांनी नामविस्ताराचा पट उलगडण्याचा प्रयत्न केला. सन १९७७ मध्ये विधानसभेत विद्यापीठ नामांतराचा प्रस्ताव पुढे आला व तेथून नामांतर समर्थक व नामांतर विरोधक अशा प्रकारची विभागणी झाली.

हे एक प्रकारचे सामाजिक न्यायाचे आंदोलन म्हणता येते असे मत डॉ. राजकुमार चाटे यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. थारकर यांनी भुषविले. नामविस्तार दिनाच्या निमित्ताने शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी चिंतन करणे आवश्यक आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रमेश सोनटक्के यांनी केले तर आभार प्रदर्शन पदव्युत्तर विभागाच्या संचालिका डॉ शैलजा बरुरे यांनी केले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होते.



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८७०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ३१/१२/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) संगिता विष्णु कुटे सर्व्हे नं. ३४/२ प्लॉट नं. १२५ सिटी स्वर्हे नं. २८४३ नं.प.सि.स. १८-१२१-१२५ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं. १२६
पश्चिम : प्लॉट नं. १२४
दक्षिण- याच सर्व्हे नं. मधील भाग
उत्तर रस्ता : ९ मिटर रुंदीचा
कॉलनी अंतर्गत रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८७१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ३१/१२/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) गिता जनार्धन उबाळे सर्व्हे नं. ३४/२ प्लॉट नं. १२४ सिटी स्वर्हे नं. २८४२ नं.प.सि.स. १८-१२१-१२५ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं. १२५
पश्चिम : सहन जागा
दक्षिण- याच सर्व्हे नं. मधील भाग
उत्तर रस्ता : ९ मिटर रुंदीचा
कॉलनी अंतर्गत रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# महसूल व पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे बदनापुरात २४ तास वाळू सुरु

जालना

बदनापूर पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर वाळू माफियांकडून मागील अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू साठा करून पुरवठा करण्यात येत आहे. मात्र, वाळू माफियांच्या अवैध वाहतूक वाळू साठ्यांकडे महसूल विभागासह पोलीस दुर्लक्ष करत असल्यामुळे बदनापूर तालुक्यात परिसरात राजरोसपणे मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू आहे. उल्लेखनीय बाब अशी की, वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या टॅक्टर धारकांकडून पोलीस व महसुल प्रशासनाला दर महा ठराविक रक्कम दिली जात असून केवळ देखावा म्हणून तीन दिवस वाळू वाहतूक बंद करण्यात आली होती मात्र शनिवार पासून पुन्हा जैसे थे परिस्थिती झाली असून बदनापूर ,अकोला ,मांजरगाव दुधना नदीच्या पात्रातुन वाळू उपसा करून विक्री केली जात आहे मात्र पोलिस प्रशासन, महसूल विभागाच्या 'हितसंबंधामुळे' हा सर्व प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून राजरोसपणे सुरू असल्याची तक्रार परिसरातील नागरिकांनी माध्यमांकडे केली आहे.विशेष म्हणजे आमदार कुचे यांनी अवैध धंदे बंद करण्याची सूचना पोलिसांना दिली असतांना तीनच दिवसात अवैध धंदे पुन्हा मोठ्या जोमाने सुरु झाले.

## आमदार कुचेच्या सूचनांना बगल

बदनापूर अंबड विधानसभा मतदार संघाचे आमदार नारायण कुचे यांनी मागील आठवड्यात बदनापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांना बदनापूर शहरासह तालुक्यातील अवैध वाळू उपसा ,जुगार ,मटका ,वेश्या व्यवसाय ,गुटखा आदी इतर अवैध धंदे तात्काळ बंद करण्याची सूचना दिलेली असतांना केवळ देखावा म्हणून तीन दिवस अवैध धंदे बंद करण्यात आले होते मात्र शनिवार पासून पुन्हा मोठ्या जोमाने सदरील धंदे राजरोसपणे सुरु झाले आहे ,विशेष म्हणजे मागील आठवड्यात सोशल मीडियावर बदनापूर पोलीस ठाण्यात कोणत्या धंदेवाल्याकडून किती रक्कम दरमहा घेतली जाते याची यादीच व्हायरल झाल्याची चर्चा सुरु आहे तसेच पुन्हा धंदे जोरात सुरु झाले आहे याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी तात्काळ कारवाई करणे गरजेचे आहे .सदर यादी कोणाच्या हस्ताक्षरात आहे ,कोणत्या पोलीस कर्माचाऱ्याने यादी बनवली याचा तपास करून सत्य जनतेसमोर आणणे गरजेचे आहे

> शहरात व तालुक्यात सुरु असलेले अवैध धंदे व इतर बेकायदेशीर धंदे बंद करण्याची सूचना पोलीस निरीक्षकाला दिलेली आहे, जर त्यांनी पुन्हा अवैध धंद्याना सूट दिली असेल तर पोलीस अधीक्षकांना तक्रार केली जाईल. बदनापूर शहरात व तालुक्यात पोलिसांच्या मर्जीने अवैध धंदे राजरोसपने सुरु आहे, केवळ हप्ते वाढवून घेण्यासाठी बंद चा देखावा करण्यात आला व पुन्हा सूट देण्यात आली, जिल्हा पोलीस अधीक्षकांनी तात्काळ कारवाई करावी असे बोलल्या जात आहे

शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून चोरट्या मार्गाने वाळू वाहतूक वाळू साठ्याचा गोरखधंदा बदनापूर परिसरात सध्या फोफावताना दिसत आहे. बदनापूर ,अकोला ,मांजरगाव,कुंभारी,कडेगाव,वरुडी आदी ठिकाणाहून दररोज अवैधरीत्या वाळूची मोठ्या प्रमाणावर राजरोस चोरटी वाहतूक करण्यात येत आहे. या चोरट्या वाहतुकीकडे संबंधित महसूल विभाग, वाहतूक स्थानिक पोलिस प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे माफियांचे फावत आहे. परिणामी शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडवून नुकसान होत आहे. याच अवैध वाहनांच्या सुसाट वेगामुळे अनेकांना आपले प्राणही गमावावे लागले आहेत.विशेष म्हणजे मागील वर्षी वाळू माफियांनी पोलिसांवर देखील हल्ला केल्याच्या घटना घडलेल्या आहेत, विनाक्रमांक धावणाऱ्या हायवा ट्रकमधून ही चोरटी वाळू वाहतूक सुरू आहे. माफियांच्या वाढत्या दहशतीमुळे तसेच प्रशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या 'मधुर संबंधामुळे' सर्वकाही सुरळीत सुरू असल्याची खंत परिसरातील नागरिकांतून व्यक्त होत आहे. सध्यावाळूपट्ट्यांचे लिलाव लालफितीत अडकल्यामुळे मागणीच्या तुलनेत वाळू उपलब्ध होत नाही. परिणामी वाळूचे भाव वाढले आहेत. याच संधीचा फायदा घेत वाळू माफिया प्रशासकीय कर्मचारी-अधिकारी तसेच पुढाऱ्यांना हाताशी धरून वाळू साठा करत मागणीनुसार वाळू विक्रीचा गोरखधंदा करत आहेत. त्यासाठी या माफियांनी रात्रीची वेळ निवडली आहे. रात्री उशिराने सुरू होणारा हा प्रवास पहाटेपर्यंत चालतो. नागरिकांनी या प्रकरणाला वाचा फोडण्यासाठी माध्यमांकडे धाव घेऊन हे प्रकरण प्रकाशझोतात घेऊन येण्यासाठी पुढाकार घेतला. मात्र, माफियांचा पोलिस प्रशासनाचा ससेमिरा नको म्हणून त्यांनी नाव छापण्यास असमर्थता दाखवली. परिसरातील अनेक नागरिकांच्या मोबाइलमध्ये अवैध वाळू माफियांच्या गोरखधंद्याचे चित्रीकरण छायाचित्रे उपलब्ध असल्याचे नागरिक सांगतात.

राज्य लोकतंत्र

गुरूवार, दि.१६ जानेवारी २०२५


# पैसे नसल्याने गावाकडे परत आणलेल्या दिंद्रूडच्या आरती कटारे यांना जीवनदान

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या मदतीने झाले उपचार



दिंद्रुड । प्रतिनिधी

नुकतीच प्रसूती झालेल्या वीस वर्षीय तरुणीच्या मेंदूत रक्तस्त्राव झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. तसेच रुग्णाला ताबडतोब संभाजीनगर ला हलविण्याच्या सूचना दिल्या. पतीने पत्नीला वाचविण्यासाठी तातडीने संभाजीनगर गाठले. मात्र डॉक्टरांची गडगंज फिस भरण्याची ऐपत नसल्यामुळे महिलेला घरी परत आणले. परंतु आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद करुन दिल्याने सदरील महिलेला जीवनदान मिळाले आहे.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील कैलास कटारे हा तरुण भूमिहीन आहे. तो पाण्याच्या जार प्लांट वर रोजंदारीने काम करुन चरितार्थ चालवतो. वडिलांचे छत्र हरवलेल्या कैलासचा विवाह दोन वर्षांपूर्वी झाला होता. दोघांचा संसार गुण्या गोविंदाने चालू होता. कुटुंबातील सर्वजण नवीन पाहुण्याचे आगमन होणाऱ्या आनंदात होते. कैलासची पत्नी आरती हिला प्रसूतीसाठी परळी येथील सरकारी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. नैसर्गिक प्रसूती झाल्यानंतर सर्वांना आनंद झाला.

परंतु तिसऱ्या दिवशी आरतीला प्रचंड त्रास होत असल्याने डॉक्टरांनी तिला अंबाजोगाई येथील स्वाराती हॉस्पिटलला पाठवले. मात्र आजार गंभीर असल्याने तेथील डॉक्टरांनी तपासणी करून संभाजीनगर येथील मोठ्या दवाखान्यात भरती ◀◀ पान ३ वर

> ब्रेन हॅमरेज झाल्यामुळे आरतीच्या मेंदूत रक्तस्त्राव झाला होता. अशा रुग्णांना ताबडतोब उपचार मिळणे अत्यंत गरजेचे असते. परंतु उपचारादरम्यान काही दिवसांचा कालावधी गेल्यामुळे रुग्णाच्या जिवितास धोका निर्माण झाला होता. मात्र डॉ. ओमप्रकाश शेटे सरांचा पाठपुरावा, आमच्या डॉक्टरांचे प्रयत्न व ईश्वराच्या कृपेने आरती कटारे आता बरी झाली आहे.
>
> – डॉ. उन्मेष टाकळकर (सिग्मा हॉस्पिटल, संभाजीनगर)

## क्रीडा स्पर्धेत विविध खेळात सहभाग नोंदवण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

युवा सप्ताहात दिन्नांक १४/०१/२०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे सकाळी ११.४५ वा. देशभक्तीपर समुहगान स्पर्धा, दि.१५ जानेवारी २०२५ रोजी स्वच्छता दिवस, दि.१६ रोजी सकाळी ११.०० वा.सत्नदिप विद्यालय, उमाकिरण कॉम्पलेक्स, शाहु नगर, बीड येथे निबंध स्पर्धा, दि.१७ रोजी तालुका क्रीडा

संकुल मौदान, खंडेश्वरी मंदीर समोर, बीड येथे सकाळी ११.०० वा. सॉफ्टबॉल व बेसबॉल खेळाचे प्रदर्शनीय सामने आयोजित करण्यात आले आहेत, दि.१८ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सकाळी ११.०० वा. देशामध्ये शांतता राखण्यात युवकांची कर्तव्ये या विषयावर चर्चासत्र, दि.१९ रोजी जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे सकाळी ११.०० वा. चित्रकला स्पर्धाचे आयोजन तर सप्ताहाचा समारोप दि.२१ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेमध्ये २१ वर्षाखालील युवक व युवतींन सहभाग घेता येईल. अधिकच्या माहिती करिता कार्यासन अधिकारी रेवनानथ शेलार यांना ९०७५४७६७९१ भ्रमणध्वन्नीवर संपर्क साधावा व जास्तीत जासत युवक युवतींनी युवा सप्ताहानिमीत्त आयोजित विविध स्पर्धा व कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.



लोकसेवा मंडळ रुग्णमित्र बीड च्या वतीने जिल्हा रुग्णालय बीडमध्ये तिळगुळ वाटप कार्यक्रम पार पडला आहे या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोकजी थोरात उपस्थित होते तसेच डॉ. सुभाषजी जोशी व डॉ. विनोद ओस्तवाल व पूर्ण वेळ कार्यकर्ता नारायण पवार व बीड रुग्णमित्र टीम सुद्धा उपस्थित होती या कार्यक्रमाचा स्वरूप दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा करण्यात आला आहे. तरी डॉक्टर नर्स ब्रदर व रुग्णांना सुद्धा तिळगुळ देऊन मकर संक्रातीचे शुभेच्छा सुद्धा देण्यात आले आहे लोकसेवा मंडळ रुग्णमित्र बीडच्या वतीने अनेक उपक्रम राबवण्यात येत आहेत. जिल्हा रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांना मोठी मदत सुद्धा या लोकसेवा मंडळ रुग्ण मित्रांच्या वतीने करण्यात येते.

## राष्ट्रीय युवा दिन, युवा सप्ताहाचे उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र शासन्नाच्या महत्वाकांक्षी योजन्नेव्दारे संपूर्ण भारतामध्ये स्वामी विवेकान्नंद यांची जन्म दिवस दि.१२ जानेरी युवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो व त्या निमित्तान दि.१२ ते १९ जानेवारी हा कालावधीत युवा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. युवकांचा सर्वांगिण विकास करणे, राष्ट्रीय व सामाजिक कार्यात सहभागी

होण्यासाठी युवकांन्ना उपयुक्त करणे त्या करिता युवकांच्या विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन्न करणे.युवकांमध्ये व्यक्तीमत्व नेतृत्व गुण विकसीत करणे, राष्ट्र उभारणी मध्ये युवकांची महत्वपूर्ण भूमिका असल्याने सामाजिक उपक्रम आयोजन, नियोजनामध्ये युवकांचा सहभाग वाढविणे, युवकांनी केलेल्या कार्याचा यथोचित गौरव करणे, शारिरिक क्षमता व व्यामाची आवड निर्माण करणे. तसेच खेळाकडे आकर्षित करण्यासाठी स्पर्धांचे आयोजन करणे, चर्चासत्र परिसंवाद,



बीड : जिल्हा न्यायालयातील ॲड. वैजिनाथ मिसाळ यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा सरकारी वकील अजय राख, दैनिक राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे, सरकारी वकील अजय तांदळे, सरकारी वकील सरवदे, सरकारी वकील अनिल तिडके, ॲड.राजेश सानप, ॲड मस्कर आदी.

## वाढीव घरपट्टी व नळपट्टीबाबत नागरिकांची मुख्याधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन पुढील दिशा ठरवणार – मोहनराव जगताप

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरातील नागरिकांना नगरपालिकेने वाढीव घरपट्टी व नळपट्टी बाबत मोठ्या प्रमाणावर मालमत्ता कर आकारणी केली असून अनेक नागरिकांना घरपट्टीच्या पावत्या पाहून धक्का बसला याबाबत अनेक तक्रारी नगरपालिकेत देऊन काहीच उपयोग होत नसल्याने शहरातील नागरिकांनी एकत्र येऊन याबाबत माजी नगरसेवक शरद यादव यांच्या पुढाकारातून शरदचंद्रजी



पवार पक्षाचे नेते मोहनराव जगताप यांचे भेट घेऊन शहरातील नागरिकांची बैठक आयोजित केली या बैठकीत नागरिकांनी अनेक तक्रारी चा पाढा मोहनराव जगताप यांच्यासमोर वाचला. अनेक जणांना कनेक्शन नसताना नळाची बिले कमर्शियल रेसिडेन्शिअल दरामध्ये य मोठी तफावत मालमत्ता करामध्ये आढळून आल्याने नागरिकांनी सर्व तक्रारी मोहनराव जगताप यांना लेखी ◀◀ पान ३ वर

## नागपूर येथील सुवर्णा डहाट राष्ट्रीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित!

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

नागपूर येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुवर्णा रंगारी डहाट यांना शिर्डी येथे नुकताच ओम साई प्रतिष्ठान व बी.बी.सी फिल्म प्राडक्शन द्वारा राष्ट्रीय पातळीवरील समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

पी.ए.फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रोजेक्ट असिस्टंट पदावर कार्यरत असून त्यांनी विविध शाळा, महाविद्यालये,




संस्था, महिला बचत गट यांना प्रत्यक्ष भेटी देऊन महिलांच्या शारीरिक व मानसिक सुधारणेसाठी मासिक पाळी व त्यादरम्यान उद्धवणा-या समस्या व त्यावरील उपाय यासंदर्भात महत्वपूर्ण कार्य करीत आहेत. सुमारे ८०० वर्षांपूर्वी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी आपली शिष्या उमाइसा हिच्या माध्यमातून निरूपण केलेली स्पृष्यास्पृष्यतेची वास्तविकता ◀◀ पान ३ वर

## स्व.संतोष देशमुखांना न्याय देण्यासाठी लढणाऱ्या योद्ध्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दुग्धाभिषेक

माजलगांव । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांना न्याय मिळावा अमानुष हत्याकांडातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी लोकशाही मार्गाने रस्त्यावरील लढाई लढणाऱ्या मराठा आरक्षण योध्दा मनोजजी जरांगे पाटील आणि सभागृहात लढाई लढणारे आ. सुरेश आण्णा धस, आ. संदिप क्षीरसागर, जिल्ह्यात सक्रिय असणारे राजेंद्र मस्के यांच्या प्रतिमेची काल दि. १४ मंगळवार रोजी वाल्मिक कराड यांना पोलीस प्रशासनाने मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केल्यानंतर परळीतील वाल्मिक कराड समर्थकांनी गदारोळ करत सार्वजनिक ठिकाणी मनोजजी




जरांगे पाटील, आ. सुरेश आण्णा धस, आ.संदिप क्षीरसागर, यांच्या प्रतिमेची विटंबना केली होती. वास्तविक पाहता लोकप्रतिनिधींनी स्व. संतोष देशमुख यांना न्याय मिळवण्यासाठी संविधानिक पद्धतीने सभागृहात व रस्त्यावर आवाज उठवला म्हणुन काल दि.१५ मंगळवार रोजी संध्याकाळी ६ सादोळा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मध्ये वरील लोकप्रतिनिधीला प्रतिमेला दुधआभिषेक केला.यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## कठोर साधनेतून भगवान बाबांना देवत्व प्राप्त झाले –ज्ञानेश्वर महाराज टेकाळे

बीड । प्रतिनिधी

कठोर साधनेतून भगवान बाबांना दैवत प्राप्त झाले भगवान बाबांनी साधने बरोबरच समाज प्रबोधन केले. दऱ्याखोऱ्यात राहणारा, वाड्या तांड्यावर राहणारा समाज शिक्षित झाला पाहिजे यासाठी भगवान बाबांनी आपल्या प्रबोधनातून समाजाला प्रोत्साहित केले. त्यामुळेच समाज प्रगतीपथावर आहे .त्याकाळी भगवान बाबांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. भगवान बाबांनी नेहमीच समाज हिताचा विचार केला समाजभर प्रबोधन बरोबर त्यांची साधनाही कठोर होती त्यामुळे त्यांना देवत प्राप्त झाले असे प्रतिपादन ज्ञानेश्वर महाराज टेकाळे यांनी आपल्या काल्याच्या कीर्तनातून सांगितले.

बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथे भगवान बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त सप्ताहाची सांगता १४ जानेवारी रोजी झाली. यावेळी ज्ञानेश्वर महाराजांचे कीर्तन झाले. या कीर्तनाला मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. यात महिलांची संख्या लक्षणीय होती. यावेळी काल्याच्या कीर्तनात ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले की भगवान श्रीकृष्णांनी गोधन पाळत असताना जंगलामध्ये जो सर्व गोपाळांना मिळून एकत्र काला केला यातून एकतेचा संदेश जातो. सर्व मानव जात एक आहे आणि प्रत्येकाने गुण्यागोविंदाने राहिले पाहिजे असा संदेश यातून मिळतो. या काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

या सप्ताहाची सुरुवात दि.७ जानेवारी रोजी झाली होती. संपूर्ण सप्ताहात अनेक संत–महंतांची किर्तने आणि प्रवचने झाली. ७ दिवस भागवत कथा प्रवचन यादव महाराज यांनी केले. बुधवारी भगवानगडाचे महंत कृष्णा महाराज यांनीही हजेरी लावली. यावेळी त्यांची रथातून ढोलताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली.



## खा. काळे यांनी रेल्वे प्रशासनाला आदेश करताच कुंभमेळ्याला जाण्यासाठी विशेष रेल्वेगाड्या सोडल्या

**जालना । प्रतिनिधी**

**खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनीकुमार यांच्याकडे हिन्दू धर्मातील अतिशय पवित्र पर्व कुंभमेळ्यात मराठवाड्यातील भक्तांना जाण्यासाठी विशेष रेल्वे सोडण्यात याव्यात अशी मागणी केली होती त्यानुसार रेल्वेमंत्री अश्विनीकुमार यांनी रेल्वे सोडण्याचे जाहीर केले आहे. मराठवाड्यातील भक्तांना खालील रेल्वेने कुंभमेळ्यात अहलाबाद येथे जाता येईल याचा अवश्य लाभ घ्यावा अशी विनंती खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केली आहे.**

प्रयागराज, उत्तर प्रदेश येथील कुंभ मेळा ला जाण्याकरीता नांदेड–पटणा–नांदेड, औरंगाबाद–पटणा–औरंगाबाद , काचीगुड–पटणा–काचीगुडा आणि सिकंदराबाद–पटणा–सिकंदराबाद विशेष रेल्वे प्रयागराज छिवकी मार्गे चालविण्यात येत आहेत गाडी क्रमांक ०७७२१ नांदेड ते पटणा ही विशेष गाडी नांदेड येथून दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी रात्री २३.०० वाजता सुटेल आणि पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, जबलपूर, इटारसी, पिपरिया, जबलपूर, काटणी, संटणा, माणिकपूर, प्रयागराज चौकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बकसर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसर्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.गाडी क्रमांक ०७७२२ पटणा ते नांदेड विशेष गाडी पटणा येथून दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १५.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच नांदेड येथे दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी ०४.३० वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.गाडी क्रमांक ०७७२५ काचीगुडा ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी काचीगुडा येथून दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १६:४५ वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, जबलपूर, इटारसी, पिपरिया, जबलपूर, काटणी, संटणा, माणिकपूर, प्रयागराज चौकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बकसर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसर्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.गाडी क्रमांक ०७७२६ पटणा ते काचीगुडा मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच काचीगुडा येथे सकाळी ०७:०० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७०९९ नांदेड ते पटणा ही विशेष गाडी नांदेड येथून दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री २३.०० वाजता सुटेल आणि पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर,जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसर्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.गाडी क्रमांक ०७१०० पटणा ते नांदेड विशेष गाडी पटणा येथून दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १५.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच नांदेड येथे दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०४.३० वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.गाडी क्रमांक ०७१०१ औरंगाबाद– पटणा ही विशेष गाडी औरंगाबाद येथून दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ आणि २५ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळ १९.०० वाजता सुटेल आणिजालना, सेलू ,परभणी,पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर,जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसर्या दिवशी ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात घरफोड्या करणाऱ्या 'डिलिव्हरी बॉईज'ची टोळी उद्ध्वस्त; १५० हिरे, ८६ तोळे सोन्याचे दागिने

**पुणे । प्रतिनिधी**

'डिलिव्हरी बॉय'चे कपडे परिधान करून शहरात घरफोड्या करणाऱ्या टोळीतील दोघा सराइतांसह एका सराफ व्यावसायिकाला स्वारगेट पोलिसांनी अटक केली. आरोपींच्या ताब्यातून दीडशे हिरे, ८६ तोळे सोन्याचे दागिने, साडेतीन किलो चांदी, दुचाकी आणि दोन पिस्तूल असा सुमारे ८० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींपैकी दोघे जण महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गतच्या (मकोका) गुन्ह्यात जामिनावर बाहेर आल्यानंतर काही महिन्यांपासून घरफोड्या करीत होते.

गणेश मारुती काठेवाडे (वय ३७, रा. मुखेड, जि. नांदेड), सुरेश बबन पवार (वय ३५, रा. बालाजीनगर, पुणे) आणि सराफ व्यावसायिक भीमसिंग ऊर्फ अजय करणसिंग राजपूत (वय ३९) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरात मागील काही दिवसांत घरफोडींच्या घटना वाढल्या आहेत.

या अनुषंगाने तपास करीत असताना पोलिस अंमलदार रफीक नदाफ, शंकर संपते, सागर केकाण, दिनेश भांदुर्गे यांना घरफोडीतील आरोपी काठेवाडे हा उंड्री परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यांनी ही बाब वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज नांद्रे यांना कळविली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. पोलिस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश काठेवाडे हा मास्टरमाइंड असून, तो एका नामांकित कंपनीचा डिलिव्हरी बॉय म्हणून गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जाऊन रेकी करीत असे. त्याची सुरेश पवार याच्याशी कारागृहात ओळख झाली होती. कारागृहातून जामिनावर बाहेर आल्यानंतर त्यांनी शहरातील विविध भागांत १४ घरफोड्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अतिरिक्त आयुक्त प्रवीणकुमार पाटील, पोलिस उपायुक्त स्मार्तना पाटील, सहाय्यक आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक युवराज नांद्रे, सहाय्यक निरीक्षक राहुल कोलंबीकर, उपनिरीक्षक रवींद्र कस्पटे यांच्या पथकाने ही कारवाई केली.




### घरफोडीच्या गुन्ह्यांची पद्धत

मुख्य आरोपी गणेश काठेवाडे घरफोडी करण्यापूर्वी एका कंपनीत फूड डिलिव्हरी बॉय म्हणून सोसायट्यांमध्ये जात होता. त्याठिकाणी रेकी करून साथीदाराच्या मदतीने घरफोडी करून मौल्यवान दागिने चोरी करीत असत. तो स्वतःची ओळख लपविण्यासाठी उच्चभ्रू सोसायटीत राहत होता. पोलिस सीसीटीव्हीच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोचू नयेत, यासाठी घरफोडी करण्यासाठी छोट्या गल्ल्यांमधून ४० ते ५० किलोमीटर प्रवास करीत असत. तसेच, वेगवेगळे जॅकेट, केसांचा विग आणि टोपी परिधान करून वेशभूषा बदलत होता. चोरट्यांनी घरफोडीतील दागिने सराफाला विकून त्या पैशांतून गोव्यात मौजमजा करण्यावर पैसे उडविले. तसेच, काही रक्कम शेअर बाजारातही गुंतविल्याचे निष्पन्न झाले आहे.

### मकोकाच्या गुन्ह्यातील आरोपी

काठेवाडे हा 'मकोका'च्या गुन्ह्यातून जामिनावर बाहेर आला होता. त्याच्याविरुद्ध यापूर्वी पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीणच्या हद्दीत दरोडा, घरफोडी आणि चोरीचे ५५ गुन्हे दाखल आहेत, तर आरोपी सुरेश पवार हा मुळशी तालुक्यातील अंबरवेडचा माजी उपसरपंच आहे. त्याच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तोही 'मकोका'च्या गुन्ह्यात जामिनावर बाहेर आला होता. त्याच्याकडून दोन पिस्तूल आणि पाच जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

# पुणे शहरात चालणार रात्रीची साफसफाई

पुणेः शहरात अनेकठिकाणी कचरा उघड्यावर पडलेला दिसतो. कचरा उचल्यासाठी पालिका प्रशासनाची गाडी देखील ट्रफिकची समस्या असल्याने वेळेत पोहचत नाही. आता पुणे महानगरपालिका प्रशासनाने यावर एक प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार आता पुण्यातील साफसफाई सकाळी नाही, तर रात्री केली जाणार असल्याची माहिती पालिका प्रशासनच्या वतीने देण्यात आली आहे. येत्या आठवड्याभरात हा प्लॅन अंमलात आणणार असल्याचे सांगण्यात आले आहे.



महापालिकेच्या वतीने उघड्यावर कचरा टाकू नका, असे सांगण्यात येते. तरी देखील अनेकांकडून नियमांची पायमल्ली करीत कचरा उघड्यावर टाकला जातो. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. यामुळे पुणे शहर सकाळी स्वच्छ असावे यासाठी महापालिका प्रशासनाने रस्त्यावरील कचरा रात्रीच उचलण्यासाठीचे नियोजन सुरू केले आहे. त्यानुसार रात्रपाळीमध्ये काम करणारे कर्मचारी, वाहने याचे नियोजन पालकेकडून करण्यात आले आहे.

पुणे महापालिकेकडे कचरा उचलण्यासाठी नवीन ८१ गाड्या उपलब्ध असणार आहेत. रात्रीच्या वेळी रस्त्यांवर टाकण्यात येणारा कचरा रात्रीच उचलण्यात यावा यासाठी महापालिका प्रशासन नियोजन करत आहे. क्षेत्रीय कार्यालयांच्या मागणीनुसार या गाड्यांचे वाटप करण्यात आले आहे. पुणे महानगर पालिकेकडे जुन्या आणि नवीन अशा ३५१ घंटागाड्या उपलब्ध झाल्या आहेत, अशी माहिती मिळत आहे. पुणे शहरातील मंडई, तुळशीबाग, टिंबर मार्केट, खाऊगल्ल्या आणि महत्त्वाच्या बाजारपेठा या ठिकाणी नागरिकांची मोठी गर्दी असते. या परिसरात रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा पडल्याचे पाहायला मिळते.

# अल्पवयीन मुलाने मौज-मजा करण्यासाठी चोरले आजीचे दागिने

पुणे । प्रतिनिधी

इंन्टाग्रामवरील मैत्रिणीसोबत मौज मजा करण्यासाठी एका अल्पवयीन मुलाने आजीची मोहन माळ चोरली. यानंतर हे दागिने विकून दोघेही मौज मजा करत फिरत होते. मात्र वडिलांनी घरातून मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार दिल्यावर खरा प्रकार उघडकीस आला.

या घटनेमुळे पालकांना मोठा धक्का बसला. ते मुलाचा ताबा घेण्यास तयार नसल्याने मुलाला बालसुधारगृहात पोलिसांनी ठेवले आहे. याप्रकरणी अल्पवयीन मुलगा आणि त्याची मैत्रिण (२४, रा.धनकवडी) हिच्यावर भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, आंबेगाव बुद्रुक येथे फिर्यादी रहातात. ते पीएमपीमध्ये कंडक्टर आहेत. त्याचा मुलगा ९ वी इयत्तेत शिक्षण घेतो. त्याची इंन्टाग्रामवर २४ वर्षीय तरुणीशी मैत्री झाली होती. ही तरुणी टॅटू आर्टिस्टचे काम करते. तीचे पहिल्या बॉयफ्रेंडबरोबर ब्रेकअप झाले होते. यामुळे ती इंन्टावर नवीन मित्र शोधत होती. अल्पवयीन मुलाशी मैत्री झाल्यावर त्यांनी प्रत्यक्षात भेटण्याचे ठरवले. दरम्यान अल्पवयीन मुलाने घरातून आजीची मोहन माळ चोरली. ही मोहनमाळ दोघांनी एकत्र भेटल्यावर विकून १ लाख ३० हजार रुपये घेतले. ते दोघांनी दोघांच्या बॅंगमध्ये वाटून ठेवले. यानंतर ते फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावर फिरत होते. दरम्यान वडिलांनी मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार पोलीस ठाण्यात नोंदवली. पोलिसांनी तातडीने दखल घेत तपास सुरु केला. तेव्हा ते दोघेही एकमेकांसोबत आढळले. त्यांना ताब्यात घेऊन चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, मुलाला न्यायालयात हजर करण्यात आले. तेथे त्याच्या वडिलांनी त्याचा ताबा घेण्यास नकार दिला. यामुळे त्याची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली. मात्र पोलिसांनी वडिलांची समजूत काढून त्यांना ताबा घेण्याची विनंती केली आहे.




बालसुधारगृहात राहिल्यास तेथील इतर मुलांच्या संगतीत राहिल्यास त्याच्या मनावर आणखी काही वाईट परिणाम होऊ शकतो. त्यापेक्षा त्याचा ताबा घेऊन त्याला समुपदेशकाकडे न्यावे असे पालकांना समजावण्यात आले आहे. याप्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक समीर कदम करत आहेत.

# संतोष देशमुख हत्या व खंडणी प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहीजे : सुप्रिया सुळे

पुणे । प्रतिनिधी

अनिल देशमुख, संजय राऊत, नवाब मलिक व छगन भुजबळ यांच्यावर केवळ ऐकीव माहितीवरुन सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) कारवाई केली. मग वाल्मिक कराडविरुद्ध खंडणीची तक्रार दाखल असतानाही ईडीने अद्याप कारवाई का केली नाही ? कराडसारख्या लोकांकडुन खंडणी गोळा केली जात असेल, तर महाराष्ट्रात कंपन्यांकडुन गुंतवणुक कशी येणार ? संतोष देशमुख हत्या व खंडणी प्रकरणात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी असणाऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहीजे,' अशा शब्दात खासदार सुप्रिया सुळे यांनी टीका करत राज्य सरकारला धारेवर धरले.

खासदार सुळे यांनी बुधवारी महापालिकेमध्ये आढावा बैठक घेत रस्ते, पाणी, समाविष्ट गावांचे प्रश्नांबाबत महापालिका प्रशासनाकडुन माहिती घेतली. त्यानंतर दुपारी एक वाजता सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप उपस्थित होते. बीडमधील वातावरण व वाल्मिक कराडाबाबत



विचालेल्या प्रश्नाबाबत सुळे म्हणाल्या, सरकारने वाल्मिक कराडची किती बॅंक खाती गोठवली आहेत आणि त्यामध्ये किती संपत्ती आहे ? हे पैसे खंडणीतुन गोळा केलेले असतील तर ईडीने त्यावर तत्काळ कारवाई का केली नाही.

संतोष देशमुख यांच्या खुनाच्या प्रकरणातील एक आरोपी अजुनही पोलिसांना सापडत नाही. आरोपींच्या आवाजाच्या नमुन्याची तपासणी झाली का ? आरोपींच्या संभाषणाबाबत सीडीआरची तपासणी झाली का ? मंगळवारी बीडमध्ये दंगल कशी झाली ? त्यावेळी पोलिस कुठे होते, हे माझे सरकारला प्रश्न आहेत.' मुंडे यांच्या राजीनाम्याविषयी सुळे म्हणाल्या, नैतिकतेच्या आधारावर आत्तापर्यंत अनेक नेत्यांनी राजीनामे दिले आहेत. मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी बजरंग सोनवणे, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, संदीप क्षीरसागर, रोहीत पवार हे नेते करत आहेत.तरीही, मुंडे यांचा राजीनामा घेतला जात नाही. शेतकऱ्यांच्या पैशांचा भ्रष्टाचारचाही मुद्दा पुढे आला आहे. संबंधित खाते मुख्यमंत्र्यांकडे आहे, त्यामुळे त्यांच्याशी याबाबत चर्चा करु. माझ्यासाठी वाल्मिक कराड हा राजकीय नव्हे, तर समाजातील गुन्हेगारीचा विषय आहे. बीड व परभणीचा विषयात मी राजकारण आणत नाही, तो माणुसकीच्या भावनेतुन बघते.'

# नायलॉन मांजामुळे मंचरमध्ये दोघेजण जखमी

**मंचर । प्रतिनिधी**


मंचर (ता. आंबेगाव) येथे पतंग उडवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजामुळे दोघेजण जखमी झाल्याची घटना मंगळवार, दि. १४ रोजी घडली आहे. मांजा वापरावर बंदी असतानाही मंचर शहरात नायलॉग मांजा आला कुठून ? याबाबत चर्चा सुरू झाली आहे. पोलीस प्रशासन व नगरपंचायत प्रशासन यांची मांजा कारवाईबाबत उदासीनता दिसून आली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की मंचर (ता. आंबेगाव) येथील एसटी बस स्थानक परिसरात दुपारी दुचाकीवर चाललेल्या तरुणाच्या गळ्यात नायलॉन मांजा अडकल्याने गळ्याला जखम होऊन तरुण जखमी झाला आहे.



तरुणाने तत्काळ दुचाकी थांबवल्याने मोठा अनर्थ टळला असून तो थोडक्यात बचावला आहे. तर दुसऱ्या एका पायी चालणाऱ्या तरुणाच्या हाताच्या बोटांना मांजामुळे जखम झाली आहे. जखमी झालेल्या दोन्ही तरुणांची नावे समजली नाही. मंचर बस स्थानकाच्या जवळपासच्या उंच असलेल्या इमारतींवर पतंग उडवले जात होते. या पतंगापैकी काही पतंग मांजासह तुटून मंचर बस स्थानकाजवळ आल्याने पतंगाच्या मांजाने दोन तरुण जखमी झाले आहे, असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले. मकर संक्रांतीच्या सणानिमित्त पतंग उडवण्याची परंपरा गेली अनेक वर्षांपासून आहे. मात्र, पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा धागा हा साधा असावा असा नियम असून मांजा वापरावर राज्यात बंदी आहे. तरीही मंचर परिसरात पतंग उडवण्यासाठी मांजाचा वापर दिसून आल्याने लहान मुले, महिला नागरिक, पक्षी, प्राणी यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मांजा विक्रीवर बंदी असतानाही मंचर शहरात मांजा कसा आला ? पोलीस प्रशासन यांनी पतंगासाठी मांजा विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी केली नाही का ? केली तर त्यांना मांजा सापडला नाही का ? असे अनेक प्रश्न नागरिकांना पडले आहेत. तर बंदी असतानाही मांजा विक्री करणाऱ्या दुकानावर कारवाई करण्याचे आदेश असतानाही मंचर पोलीस व नगरपंचायत प्रशासन विभाग फक्त डोळे झाकून पाहत राहिला का? असा प्रश्न देखील अनेक नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# ओतूरच्या बाबीतमळ्यात आणखी एक बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद

ओतूर (ता. जुन्नर) येथील श्रीक्षेत्र कपर्दिकेश्वर मंदिर परिसरातील पिंपळगाव जोगे कालव्याशेजारी ग्रामस्थांच्या मागणीनुसार १५ दिवसांपूर्वी वन विभागाने पिंजरा लावला होता. याच पिंजऱ्यात बुधवारी पहाटे एक पूर्ण वाढ झालेला नर जातीचा बिबट जेरबंद झाला, अशी माहिती ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी लहू ठोकळ यांनी दिली.



जेरबंद झालेल्या बिबट्याचे वय अंदाजे ७ वर्षे असावे. ही माहिती मिळताच ओतूर वन विभागाच्या वनपाल सारिका बुट्टे, वनरक्षक विश्वनाथ बेले, उदापूरचे वनरक्षक दादाभाऊ साबळे, किसन केदार, गणपत केदार, फुलचंद खंडागळे, गंगाराम जाधव, प्रदीप तांबे यांनी घटनास्थळी तत्काळ पोहचून पाहणी करून बिबट्यास ताब्यात घेतले. त्याला माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे दाखल करण्यात आले. या वेळी मनोहर जाधव, गणेश खंडागळे, पोपट मालकर, तुकाराम गीते, सुरत सावंत, गणेश गीते, रमेश गीते, संदीप गीते, दीपक घुले, संपत पानसरे आदी ग्रामस्थांनी मदत केली.

# महाराष्ट्र कबड्डी संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती झालेल्या वैभवी जाधवचा वाघोलीकरांकडून गौरव

**वाघोली । प्रतिनिधी**

वाघोली तालुका हवेली येथील वाघेश्वर स्पोर्ट्स क्लबची कबड्डी खेळाडू वैभवी राजू जाधव हिची महाराष्ट्र कुमारी गट कबड्डी संघाच्या कर्णधार पदी निवड करण्यात आली. उत्तराखंड येथे ८ ते ११ जानेवारी दरम्यान झालेल्या ५० व्या कुमारी राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेमध्ये वैभवीने महाराष्ट्र संघाच्या कर्णधार पदाची धुरा सांभाळली आहे. निवडीनंतर तिच्यावर जिल्हा तसेच वाघोली परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वाघोली ग्रामस्थांच्या वतीने जाधव हीचा सत्कार करण्यात आला.



वैभवी जाधव वाघेश्वर स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर मागील ६ ते ७ वर्षांपासून सराव करीत आहे. महाराष्ट्र नुकत्याच झालेल्या सांगली येथील महाराष्ट्र राज्यस्तरीय कुमार कुमारी निवड चाचणी कबड्डी स्पर्धेमध्ये पुणे ग्रामीण संघाचे कर्णधार पद सांभाळत असताना चमकदार कामगिरी करून संघाला विजेतेपद मिळवून दिले होते. या स्पर्धेतून २४ खेळाडूंचा राज्याचा संघ निवडला गेला. मुंबई येथे सराव शिबीर होऊन अंतिम १२ खेळाडूंचा संघ निवडण्यात आला असून या संघाचे नेतृत्व वैभवी जाधवने केले आहे. मागील वर्षीदेखील महाराष्ट्र राज्याच्या संघामध्ये तिची निवड करण्यात आली होती. यावेळी तिने कर्णधार पदाची धुरा सांभाळली आहे. वाघोली ग्रामस्थांच्या वतीने जाधव हीचा विविध राजकीय सामाजिक शैक्षणिक तसेच महिला वर्गांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी वाघोली मधील अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

# पतीच्या छळाला कंटाळून पत्नीची आत्महत्या

तळेगाव ढमढेर । प्रतिनिधी

सणसवाडी (ता. शिरूर) येथील महिलेला वडिलोपार्जित जमिनीच्या हक्कसोडपत्रानंतर मिळणार असलेले पैसे मागण्यासाठी पतीने छळ केल्याने एका विवाहितेने सोमवारी (दि. १३) राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

छाया विधाटे (वय ४०) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत मयत महिलेची बहीण जया गवळी (वय ३६) यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी महिलेचा पती विजय विधाटे याच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. सणसवाडी येथील छाया विधाटे यांच्या वडिलांनी काही दिवसांपूर्वी त्यांच्या जमिनीचे सर्व मुलींकडून हक्कसोडपत्र करून घेतले. तसेच मुलींना काही पैसे देणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर छाया यांचा पती विजय वारंवार पत्नीला वडिलांकडून हक्कसोडचे पैसे घेऊन येण्यासाठी तगादा लावत शिवीगाळ, दमदाटी, मारहाण करून छळ करत होता. याबाबत छाया यांनी त्याच्या बहीण व भावाला सांगितले होते. त्यानंतरही विजयकडून छळ सुरू असल्याने छायाने गळफास घेऊन आत्महत्या केली.

# आधुनिक युगात शांतता टिकवण्यासाठी लष्करी ताकद आवश्यक : प्रा. पाओलो वॉन शिराक

पुणे - महात्मा गांधी यांनी जगाला अहिंसेचा संदेश दिला आणि संपूर्ण मानवतेला प्रेरणा दिली. आधुनिक काळात शांतता टिकवण्यासाठी लष्करी ताकदीसह विचारशीलतेची गरज आहे. त्यासाठी आर्थिक ताकद वाढविणे गरजेचे आहे, असे मत ग्लोबल पॉलिसी इन्स्टिटयूटचे अध्यक्ष व वॉशिंग्टन डी.सी. येथील बे अटलांटिक विद्यापीठातील प्रा. पाओलो वॉन शिराक यांनी व्यक्त केले.



डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ (एडीवायपीयू) आणि ग्लोबल पॉलिसी इन्स्टिटयूट (जीपीआय) वॉशिंग्टन डी.सी. यांच्यात रणनीतिक भू-राजकीय अभ्यासाच्या क्षेत्रात शैक्षणिक सहकार्य वाढवण्यासाठी सामंजस्य करार झाला आहे. रणनीतिक भू-राजकीय आणि सुरक्षा मुद्दे या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या दरम्यान हा करार करण्यात आला.

डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार जैन, भू-राजकीय तज्ज्ञ डॉ. निशिकांत ओझा आदी उपस्थित होते. या करारांतर्गत एडीवायपीयू - जीपीआय चॅप्टरची स्थापना करण्यात आली असून यात संयुक्त संशोधन उपक्रम, शैक्षणिक देवाणघेवाण, विशेष अभ्यासक्रम आणि कार्यशाळांचा समावेश असणार आहे.

हा सामंजस्य करार जागतिक सहकार्याचे प्रतीक आहे. या करारामुळे संशोधक, विद्यार्थी आणि धोरणकर्त्यांना जागतिक प्रश्नांवर विचारमंथन आणि संशोधनाची संधी मिळेल, असे मत डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील यांनी व्यक्त केले आहे. जीपीआय सोबत झालेला हा करार एक ऐतिहासिक टप्पा आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना जागतिक भू-राजकीय अभ्यासात नवे दृष्टिकोन मिळतील, असे डॉ. राकेश कुमार जैन यांनी सांगितले. एडीवायपीयू - जीपीआय यांच्यातील भागीदारी विचारशक्तीला चालना देणारी आणि जागतिक पातळीवर समस्या सोडवण्याची मोठी संधी निर्माण करणारी आहे, असे डॉ. निशिकांत ओझा यांनी सांगितले आहे.

# ९ दिवस खोलीत डांबून लैंगिक अत्याचार; नराधमाला बेड्या

बारामती: परप्रांतिय महिलेला रोजगार देतो असे सांगत बोलावून घेत तिला धाक दाखवून डांबून ठेवत तिच्यावर लैंगिक अत्याचार करणार्याला स्थानिक गुन्हे शाखा व माळेगाव पोलिसांनी अटक केली आहे. बारामती तालुक्यातील पणदरे गावच्या हद्दीत एका हॉटेलच्या पाठीमागील पत्र्याच्या खोलीतून पीडित महिलेची पोलिसांनी सुटका केली.

पोपट खामगळ (वय २५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पीडित महिला मूळची मध्यप्रदेशातील आहे. ती तळेगाव दाभाडे येथे पतीसह काम करत होती. कंपनीतील काम सुटल्याने तिचा पती गावी गेला होता. ती एकटीच असताना एका महिलेने तिची पोपट खामगळशी ओळख करून दिली. त्याचा हॉटेल व्यवसाय असून तेथे काम मिळेल असे तिला सांगितले. १५ हजार पगार ठरविण्यात आला. त्यानुसार खामगळने तिला पणदरे येथे दि. २ जानेवारी रोजी बोलावून घेतले. तेथे दि. ३ जानेवारी रोजी पत्र्याच्या खोलीत ही महिला झोपली असताना त्याने पहाटेच्या वेळी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. कोणाला काही सांगितल्यास खून करेल अशी धमकी दिली. मी तुझ्यावर पाळत ठेवण्यासाठी माणसे नेमली आहेत, पळून जायचा प्रयत्न केला तर नक्की खून करेन अशी धमकी त्याने तिला दिली. दि. ११ जानेवारीपर्यंत तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. दरम्यान हॉटेल कामासाठी आलेल्या एका जोडप्यातील महिलेला सुद्धा शरीरसंबंधासाठी तयार कर, असे त्याने या पीडितेला सांगितले. पीडितेने त्याला नकार दिल्याने त्याने तिला मारहाण करत पुन्हा तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

जोडप्यातील एका महिलेच्या फोनवरून पीडितेने ही माहिती नातेवाईकांना दिली. त्यानंतर नातेवाईकांनी पोलिसांना संपर्क साधला. त्यानंतर पोलिसांनी पीडितेची सुटका केली. खामगळ याचेविरोधात लैंगिक अत्याचारसह विविध कलमानुसार गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली. ही कामगिरी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, माळेगावचे सपोनि सचिन लोखंडे, कुलदीप संकपाळ, संध्याराणी देशमुख, देवा साळवे, अमोल खटावकर, अंमलदार अभिजित एकशिंगे, स्वप्निल अहिवळे, राहुल पांढरे, विजय वाघमोडे, ज्ञानेश्वर मोरे, अर्चना बनसोडे, गोदावरी केंद्रे यांनी केली.